
काळीज मोहरणं
किरण लोखंडे
ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव **काळीज गोंदण**

प्रकार : **आत्मबंध संग्रह**

लेखक : **किरण लोखंडे**

iron_ray@rediffmail.com

9922919438

मुखपृष्ठ : **श्री. प्रकाश सपकाळे**

अंतर्गत सजावट : सुनिल सामंत

प्रकाशन : **ई साहित्य प्रतिष्ठान**

*e Sahity Pratishthan*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*

esahity@gmail.com

9869674820

*www.esahity.com*
*www.ednyaneshwari.com*
*www.marathiriyasat.com*

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाट्य, सिने रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे

**©esahity Pratishthan® 2012**

# मी ऋणातच राहतो...

मी साधा मातीचा गोळा. उण्यापुऱ्या ४२ वर्षांचे आयुष्य घडताना ज्यांचा ज्यांचा परीस स्पर्श मला लाभला, त्यांच्या ऋणातून मुक्त कसा होणार?

जेव्हा-जेव्हा कोसळलो तेव्हा तेव्हा मला सावरणारे हात आपसूक पुढे आले. त्या हातांबद्दलची कृतज्ञता शब्दांच्या चिमटीत पकडणे केवळ अशक्यच. तरीही त्यांच्या ऋणातच राहण्यास्तव हा शब्दप्रपंच!

गत सोळा वर्षांपासून 'लोकमत'मध्ये काम करतोय. माझ्या या परिवाराने केवळ मला पायावर उभेच केले असे नव्हे, तर आभाळ शिंपण्याचे बळही दिले आणि त्यामुळेच चार बरे- वाईट शब्द लिहू शकलो. माझे सुदैव असे की, आजवर मला लाभलेल्या साऱ्याच वरिष्ठांनी माझ्यावर अपार माया केली. माझ्या हाताला धरून 'सुरक्षित' प्रवास घडविला. माझ्यातल्या अवगुणांचे टवके हळुवारपणे उडवत सन्मार्गावर नेणारे आणि माझ्यावर पितृवत माया करणारे 'लोकमत'चे सांप्रत संपादक मा. श्री. हेमंत कुलकर्णी आणि आजवरच्या प्रवासात सुहृदच नव्हे, तर सहोदर बनत पाठराखण करणारे उपनिवासी संपादक मा. श्री. किरण अग्रवाल यांच्याबद्दलची कृतज्ञता काळजावर गोंदून ठेवली आहे. 'लोकमत'चे माजी कार्यकारी संपादक मा. श्री. दत्ता सराफ व मा. श्री. विजय बाविस्कर यांनी केलेली आभाळमाया विसरणे म्हणजे कृतघ्नपणाच ठरेल.

व्यक्तिगत आयुष्यातही जिवाभावाची माणसे जोडता आली हे माझे भाग्यच! या वर्तुळातील माणसांची यादी खूपच मोठी, त्यामुळे साऱ्यांचा नामोल्लेख करणे केवळ अशक्य...

माझ्यात सर्वस्वाने विरघळून गेलेली सौभाग्यवती वैशाली, जिच्यामुळेच पुनर्जन्माचे भाग्य लाभले आाणि मी इथपर्यंत आत्मविश्वासाने पोहोचलो. जन्मोजन्मी सौ. वैशालीच्या ऋणात राहणेच मी पसंत करीन.

सदर पुस्तक प्रकाशित व्हावे यास्तव सातत्याने 'आरी' टोचणारा सन्मित्र किरण भावसार, लोभस मुखपृष्ठ करणारे प्रकाश सपकाळे आणि माझे वेडेवाकडे शब्द प्रकाशित करण्याचे धारिष्टे दाखविणारे सुनील सामंत यांचे ऋण कोणत्या शब्दांत व्यक्त करू?

जाता जाता इतकेच की -

मज स्तुतीचे हार नको,<br>
मज निंदेचे प्रहार नको,<br>
मज स्नेहाचा मकरंद हवा,<br>
मम थडग्यावर रोज उगावा,<br>
नित्य रुजावा गुलाब नवा!

**- किरण लोखंडे**

## अर्पण...

तीर्थरूप स्व. काशीनाथ गोपाळराव लोखंडे (गुरुजी)<br>
आणि<br>
मातोश्री स्व. सावित्राबाई<br>
यांच्या स्मृतीस....



# लेखकाविषयी...

किरण लोखंडे गत वीस वर्षे पत्रकारितेत आहेत.
नाशिक येथून दै. गांवकरीमधून पत्रकारितेस प्रारंभ.
सतरा वर्षांपासून 'लोकमत'मध्ये सेवारत.
आजवर वेगवेगळ्या विषयांवर विविधांगी लेखन.
शोधवार्तांमध्ये विशेष रूची..
'लोकमत'तर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय
शोधवार्ता पुरस्कारानेही सन्मानित.
सांप्रत 'लोकमत'मध्ये उप वृत्तसंपादक पदावर
कार्यरत...

आगामी

चांदणसखी
(प्रीतीकाव्य पुस्त)
झपाटलेली झाडं
(लेख संग्रह)
आदि...

सुन्न...

.

.

.

.

.

किरण लोखंडेंचं हे पुस्तक जर मनोरंजन म्हणून किंवा कुतुहल म्हणून वाचायचं म्हणत असाल तर नकाच वाचू. इतर खूप पुस्तकं आहेत अवती भवती. ती वाचा. या पुस्तकाच्या वाट्याला जाऊ नका असा एक अनाहूत सल्ला आम्ही देऊ.

.

.

.

एक प्रकाशक म्हणून आम्हाला पुस्तक वाचावंच लागतं. नाहीतर माझ्या कुवती बाहेरचं हे पुस्तक होतं. एक दोन आत्मबंध वाचल्यावर पुढे वाचायला मन धजेचना. पण रेटत गेलो. एकादं भयावह स्वप्न पहावं, आणि झोप मोडण्याची तीव्र इच्छा व्हावी तसं होत होतं. पण पुस्तक प्रकाशित करायचं तर वाचायला हवंच ना! म्हणून हे पुस्तक पूर्ण वाचलं. सैरभैर होईतो वाचलं. आणि नंतर ...सुन्न...

.

.

वास्तवाच्या विस्तवाशी खेळायची हौसच असेल तर वाचा बापडे !...

.

..... सुनिल सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३
विठ्ठल मंदिरासमोर,
सावता नगर,
सिडको,
नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८
९८२२५२११४०

# काळीज गोंदण खरडण्यापुर्वी...

दरीतल्या एकांताच्या क्षणी अष्टदिशा लवल्या, त्यांची टोकं एकत्र करून त्या देहाभोवती गुंडाळल्या, त्यांची घट्ट गाठ बांधली की मग काही चित्रांनी अंधारगृहाचे कोपरे हळूहळू उजळू लागतात. कातळावर कोरावी अलवार नक्षी, तशा आठवणी काळजावर गोंदलेल्या. या अशा निवांत अवकाशात त्या खरडवून निघतात. भळभळतात, वाहू लागतात एखाद्या गहिऱ्या घावातून स्त्रवणाऱ्या चिरंतर वेदनेसारख्या. वेदनांचे धागे एकत्र गुंडाळावे लागतात, नाही तर अवघ्या देहाचं नंगेपण झाकताना त्या वरच्या अष्टदिशा अपुऱ्या पडतात. मग अशा वेळी आभाळाचे खांब आपणच का होऊ नये? खांब. निर्लेप, तेलकट, धुरकट, फिक्कट माणसांसारखे. माणसं तरी कशी? हाडामांसाची, मातीतून उगवलेली, मातीत जाणारी. मला भेटलेली ही सारी माणसं खरी, काही कचकड्याची. काहींच्या स्पर्शानं फुललेला ऊर, काहींच्या धक्क्यानं ओसरलेला पूर. काही काजळडोळ्यात वसलेली, काही काचेवरून सटकणाऱ्या पाण्याच्या थेंबासारखी, काही भिंतीला चिकटलेल्या पालीसारखी, लिबलिबीत, किळसवाणी...

- तर या अशा साऱ्या माणसांनी मला दिलेल्या सुखाचे, मला भोगलेल्या क्षणांचं हे काळीज गोंदण...

माणसांचं जगणं हे दोन प्रकृतीत दुभंगलेलं आहे, असं मला वाटतं. जगण्याच्या दोन स्तरातला पहिला आहे, व्यावहारिक. जो पैशांभोवती केंद्रित झालेला आहे. दुसरा मानसिक भावविश्वाचा. हे भावविश्व लैंगिकतेच्या आदिम प्रेरणेवर उभं ठाकलेलं असतं. पहिलं जगणं बाह्यात्कारी, कसं आहोत यापेक्षा कसं दिसतो याला अधिकतम महत्त्व असलेल्या या जगात ऊर फुटोस्तोवर धावावं लागतं, ते पैशांमागं. बरं, हा पैसा सहज हाती लागतोच असं कधी घडत नाही. एखाद्या घोड्याच्या डोक्यावर आडवी, त्याच्या तोंडापेक्षा दूर अशी गवत असलेली पेंडी बांधावी आणि ती मिळलेच या आशेनं त्या घोड्यानं धावत रहावं, अशी आपण गर्दभकुलीन माणसं, पैशासाठी धावत राहणारी...

दुसरं आतलं जग यापेक्षा वेगळ्या जाणिवांनी खूप समृद्ध वगैरे असतं. त्याची वीण लैंगिकतेच्या केंद्रिभूत नेणीवांशी घट्ट बांधलेली असते. असं माझं मत (अगदी वैयिक्तक) आहे. मनाच्या खोल तळ्यात, अगदी खोल खोल दडून बसलेल्या या सहज प्रेरणेतून उत्प्रेरीत झालेल्या भावनेच्या वेलीला प्रितीची सर्वांग सुंदर फुलं येतात आणि या प्रितीच्या पळसाप्रमाणेचं वासनेनं ओंथबून वाहणारी बांडगुळं देखील. म्हणजेच प्रेम, माया, जिव्हाळा, कौतुक वगैरे वगैरे ही लैंगिकतेची साजरी-गोजरी रूपे आहेत तर विषय-वासना ही त्याची काजळकडा !

मग अशी आंतर बाह्य जगात जगणारी आपण सारी माणसं, आतल्याचा झोक सांभाळत, बाहेरच्याचा तोल सावरत, मरण येईस्तोवर जगणं भोगत असतो. आपल्याला दुसऱ्याच्या घरात, मनात डोकावण्याची नैसर्गिक सुलभ भावना असते. काहींना तर इतकी की, अशी माणसं कोणाच्याही घरात दरवाजातून न जाता खिडकीतून डोकावून अपार सुख अनुभवतात. परदुःख शीतल असतेच, पण आपल्या दुःखापेक्षा दुसऱ्याचं दुःख पाहून सुखावणारी वा आपल्या सुखाऐवजी दुसऱ्याचं सुख पाहून दुखावणारी माणसं मग विषयवासनेची बांडगुळंच नव्हेत काय?

आतलं जग सर्वार्थानं स्वप्नांचं असतं. अपुऱ्या वासनांचा सुप्त अविष्कार या स्वप्नात परिपूर्तीला जातो. जे हाती

**पान दोन पाहा**

कधीच सापडलेलं नसतं. ते मिळाल्याचा आभास (स्वप्नातला) जगण्याचं बळ देऊन जातो खरा, पण जी माणसं या आभासातल्या दवाला हाती धरून वास्तवात जागे झाल्यावर देखील ओलसर, सर्द राहतात, त्यांना भान राहत नाही अन् म्हणून मग ती अपुऱ्या इच्छा, वासनांच्या पूर्तीसाठी पिसाट होतात. अशा माणसाचं जग मी जवळून पाहिलं आहे, काहीसं साहिलं आहे. त्यातून माझ्या तळहाती चिकटलेला व्रणांचा दाह मी माझ्या उरावर कोरला आहे, तेच हे काळीज गोंदण...

हे झालं हातावरल्या व्रणाचं, पण पायाच्या तळव्याला असलेल्या रेषांमध्ये रूतून बसलेल्या मातीचं काय? ऐहिक सुखासाठी कपाळावर रेखलेला भोगवटा सोसत आपण धावत राहतो. त्यासाठी गाव सोडावा लागतो. गाव सोडला तरी तळपायाला माती घट्ट चिकटलेली असतेच. मग मघाशी म्हटल्याप्रमाणं एकांताच्या गहिऱ्या दरीतली वनराई अंगावर ओढून घेतल्यावर उजळलेल्या कोपऱ्यातून गावाकडची गोदावरी, तिच्यावरचा घाट, वेताळबाबाचा ओटा, महादेवाचं देऊळ, दगडाची आळी, भंगलेला वाडा, दारासमोरचा सडा, काशिनाथाचं दुकान, शिप्याचं मकान, सुताराच्या खळ्यातली गाडी, पाटीलबाबाची माडी, मारूतीचं देऊळ, देवळातली शाळा, शाळेच्या पटांगणातील मारूतीचे मोठे गोटे, गावाबाहेरची येडी बाभळ, यमाबाबाचा मळा, बंडूबाबाची चिंच, पाची आंबे आणि आमचं घर हे सारं सारं खुणावू लागतं. मनच नाही तर सारा देह हलका पिसासारखा होत वाऱ्यावर वाहत जावून घरापुढच्या निंबाच्या झाडावर बसतो. घर, आई, बाप, भाऊ, वहिनी, आत्या, काका, मावशी वगैरे वगैरे सारे जमतात. डोळ्यातून सांडणाऱ्या आसवांमधून त्यांची अवघी स्मृतिचित्रं वाहू लागतात. लहानपणापासून सानपणापर्यंत ओंजळीत साठवलेल्या आठवणींच्या शिंपल्याचं शुभंकर तोरण, खोल खोल काळजावर उभारलेलं, तेच हे काळीज गोंदण...

माणसं तरुण असतात तेव्हा विजातीय देहाच्या आसक्तीची गाणी जन्माला येतात. प्रेमाची अल्लडता अन् शरीरधर्माची अपरिहार्यता यांच्या सीमारेषा इतक्या अस्पष्ट की, तो आणि ती ही रेषा कधी ओलांडतात ते समजत नाही. अर्थात प्रत्येकाच्याच वाट्याला असं परिपूर्णत्वाचं दान येतंच असं नाही. बहुंताश प्रत्येकाला विरहाची व्यथाच जाळीत असते. अशा जळालेल्या, करपटलेल्या ओरखड्यांमधून मी छेडतो जेव्हा आसवांनी माझीच विफल प्रितीकथा, तेव्हा कागदही ओला होतो. ही कथा माझी नव्हेच. माझ्यासारख्या अनेकांची, याची, त्याची, त्यांची, यांची, साऱ्यांची. त्यानं घेतलेलं तिचं पहिलं चुंबन, तिनं दिलेलं मोरपिस, त्याचं हसणं, तिचं रूसणं, तिच्या डोळ्यातलं पाणी, त्याच्या ओठातली उदास गाणी, इत्यादी इत्यादी हे सारं गोंजारून तिनं माझ्या काळजावर तिच्या ओठांनी ठेवलेला चटका, तेच हे काळीज गोंदण...

**- किरण लोखंडे**

iron_ray@rediffmail.com



# कौलातून सांडलेल्या कवडशाचा काळीजव्रण

१

# कौलातून सांडलेल्या कवडशाचा काजळव्रण

**थकलेल्या** भिंती जेव्हा त्यांच्या कारव्यांचे सापळे गोळा करून अंग चोरतात, तेव्हा कौलाचं छप्पर पांघरूण घेतलेल्या भिंतींच्या कोपऱ्यात, चुलीपाशी धुरात कोंदटलेल्या श्वासामुळे गुदमरून गेलेल्या आईच्या डोळ्यातून खाली ओघळलेल्या नक्षत्रात तिच्या काळजावर दाहलेल्या 'काजळव्रण' मला खुणावत असतो. कौलाच्या फटीतून सांडलेला हा काजळव्रण आईनं आयुष्यभर सोसला. प्राक्तनानं गरिबीची दान असं भरभरून दिलं की, पुढचा टाका टाकताना मागचा कधी उसवून गेला हे तिला कधीच समजलं नाही. त्यात हा काजळव्रण म्हणजे आधीच ठिगळलेल्या तिच्या आयुष्यावरला विद्रूप चट्टाच. ती जेव्हा मरणाच्या दारात उभी होती तेव्हा तिनं तिच्या फूल पडलेल्या डोळ्यातून माझ्याकडं पाहिलं होतं अन् ओठातून ओघळणाऱ्या शब्दात ओलं होत तिच्या काळजावरचा काजळव्रण माझ्या तळहाती ठेवला होता. म्हणाली होती, 'तू जेव्हा तुझं स्वत:च घर बांधशील तेव्हा हा काजळव्रण तुझ्या घराच्या कौलांवर चिकटवून ठेव. माझी जेव्हा सय येईल तेव्हा कौलांच्या फटीतून दिसणाऱ्या आभाळावर गोंदलेल्या नक्षत्राकडे बघत जा.' एव्हढं सांगून आई गेली, मग मी तो काजळव्रण कपाळावर रेखला...

काय होता हा काजळव्रण? तो होता, ठसठसता, अपमानाचा चिरंजिवी दाह, की भोगलेल्या गरिबीची अक्षय वेदना? कदाचित दोनही !

रस्त्यावरून असं डावीकडं बघितलं की, शेजारच्या नाल्यातून पल्याड जाण्याचा एक छोटा बांध दिसायचा. नाल्याच्या कडेला साबरीची दाट झाडी अन् नथुभाऊच्या वावराच्या कोपऱ्यावरचं शेवग्याचं झाड. या दोहोंच्या मधून घराकडं जाणारा बांध. बांधाच्या अगदी चिकटून कोपऱ्यावर विटात बांधलेली चाळसदृश इमारत. ती आमची नाही. त्याच्या अगदी शेजारी पश्चिमेला आमचं घर. दोन पाख्यांचं. कारव्यांच्या भिंती बांधून त्यावर पांढऱ्या मातीचा गिलावा दिलेला. पूर्वी पूर्वेकडे दरवाजा होता तेव्हापासूनचं आमचं घर डोळ्यात साठवलेलं आहे. दरवाजा म्हणजे दोन फळ्यांचे तुकडे एकमेकांना जोडलेले असायचे. दरवाजा उघडला की त्याच्या शेजारी डाव्या हाताला पडवी होती. तिथं पावसाळ्यात शेवरी गाय कायम बांधलेली असायची. त्यातच एका कोपऱ्यात गव्हाचं भूस साठवलेलं. पावसाचं पाणी झिरपून त्यात शिरलं की भूस काहीसं कुजू लागे. मग त्याचा ओलसर, आंबटसा वास पसरत असे.

पावसाळ्यात घराभोवती असा चिखल होत असे. शाळेतून आल्यावर कर्दमलेले कपडे झटकन काढून फेकत थडथडणाऱ्या अंगानं चुलीजवळ बसलं की, मग ऊब येत असे. चुलीभोवती खोडक्या पडलेल्या असतं. एकीकडं त्या चुलीत टाकत दुसरीकडं आई स्वयंपाक करीत राही. चुलीच्या धुरात गुदमरून कधी कधी आईला खोकल्याची ढास लागे. बाहेर पाऊस कोसळत राही. रात्री जेवणं झाली की, आईशेजारी तिच्या कुशीत सर्द गोधडी पांघरूण घेत मी झोपून जाई. रात्रभर ढगातली म्हातारी हरबरे भरडत राही अन् कौलांवर पावसाचा मोर नाचत राही. कौलांच्या फटीतून, आढ्यावरच्या ढाप्यांच्या फटीतून पावसाचे तुषार कारंजासारखे येत.

हा असा पाऊस मी माझ्या आठवणींच्या ओंजळीत घट्ट पकडून ठेवला आहे. पावसात खूप हाल होत असतं. एकतर वडील नोकरीनिमित्त बाहेरगावी असत. आई आम्हा भावडांना घेऊन गावी, मळ्यातल्या, या आमच्या घरात राही. घर फार गळू नये म्हणून मे-जूनमध्ये ते शाकारावं लागे. काही फुटकी जुनी कौलं काढून टाकावी लागत. काही नव्यानं टाकावी लागत. दरवर्षी नवी कौलं घेणं परवडत नसे. मग कोणाची तरी जुनी-बऱ्यापैकी कौलं घेऊन घर शाकारावं लागे. मी मघाशी आईच्या काजळव्रणाची जी सय सांगितली ती अशाच कौलांसंदर्भातील आहे.

एका वर्षी जून संपत आला तरी आमचं घर शाकारलं गेलं नव्हतं. वडील नोकरीच्या गावाहून वेळेवर येऊ शकले नाहीत. आई एकटी बिचारी झाली. जुलैचा पहिला आठवडा सुरू झाला. आकाशाला ढगांनी काळे कपडे घातले. दुपारी झाडावरली पाखरं अन् पानंदेखील गप्प झाली. सायंकाळी वाहू लागलेला वारासुद्धा कधी अंगात आल्यागत घुमू लागला. वातावरणातील बदल पाहून आई आणखीच गरीब झाली. शेवटी एकदाचे वडील आले. आले ते दीन चेहऱ्यानेच. त्यांचा अजून पगार झालेला नव्हता. खिशात दमडी नाही. घरावर कौल नाही. कोणत्याही क्षणी पाऊस आला तर घर कागदाच्या होडीसारखं वाहून नदीत जाईल अशी आम्हा भावडांना भीती वाटत होती. आमचे चेहरे वाचून आई-वडिलांना गलबलून येत असावं. शेवटी गावातून कोणाकडून तरी जुनी का होईना, उसनी म्हणून का होईना कौलं आणावीत असं आईनं सुचवलं. 'आणायची तर कोणाकडून का? गावात असलेल्या पाहुण्यांकडून आणू', असा विचार करून वडील त्या मळ्यात गेले. पाहुणे चोपाळ्यावर बसलेले. समोर चार गावची मंडळी

**पान दोन पाहा**

# कौलातून सांडलेल्या कवडशाचा काजळव्रण

आलेली. वडील तेथेच खाली बसले. हळूच कौलांचा विषय काढला. तसे पाहुणे म्हणाले, ‘मास्तर मी काय धर्मादाय संस्थान सुरू केलंय. अहो, घरावर कौलं टाकायची ऐपत नसेल तर संसार तरी का करता? कशाला पोरं जन्माला घालता?’ हे शब्द निखारे कसेबसे गिळत वडील तेथेच बसून राहिले. पाहुण्यांचे शब्द बहुतेक स्वयंपाक घरात ऐकू गेले असावेत. मालकीणबाई बाहेर आल्या आणि म्हणाल्या, ‘अहो, मास्तर गरीब झाले म्हणून का त्यांची अशी थट्टा करायची? द्या त्यांना दहा-बारा कौलं.’ त्यावर पाहुणे म्हणाले, ‘मास्तर घेऊन जा ८-१० कौलं; पण आठ दिवसात मला नवीन कौलं आणून द्या, नाही तर घरच उचलून आणील तुमचं.’ मग मालकीणबाई म्हणाल्या, ‘काय बाई वागणं तुमचं. आपल्याला ८-१० कौलं म्हणजे का सोनं व्हय. आपली गडी-माणसं घर शाकारताना २०-२५ कौलं फोडतात’. त्यावर पाहुण्यांनी मालकीणबाईकडं डोळ्याच्या कोपऱ्यातून पाहिलं आणि हळू स्मित केलं. मग मालकीणबाईंनी मास्तरांना ‘काळजी करू नका, घेऊन जा हवी तितकी कौलं’, असं सांगितलं.

वडील घरी आले. अर्थात सशाचं काळीज घेऊनच; पण, त्यांनी आईला काही सांगितलं नाही. फक्त कौलांची सोय झाली असं म्हणत थोरल्या भावाला सायकलवर कौलं आणायला त्या मळ्यात धाडलं. कौल आणली गेली. थोरला कौल शाकारण्यासाठी छप्परावर चढला. वडील त्याला खाली उभे राहून सूचना देऊ लागले. ज्या ठिकाणी दोन कौलं जोडलेली असतात त्याला ‘सांधा’ म्हणतात. त्यावर पाय ठेवून चाललं म्हणजे कौल फुटत नाही. घरात प्रकाश राहावा म्हणून वडिलांनी कौलाच्या आकाराची काच मागेच केव्हातरी आणलेली होती. मग थोरल्यानं कौलांबरोबर ही काच व्यवस्थित लावली. आख्खा पावसाळा संपला. मालकीणबाईंनी ‘काळजी करू नका’ असं सांगितलेलं असल्यामुळं आणि पाहुण्यांनी बहुतेक आपली थट्टाच केलेली असावी, असं समजून वडिलांनी पाहुण्यांना नवी कौलं आणून दिली नाहीत. ते नेहमीप्रमाणं नोकरीच्या गावी निघून गेले.

आता पावसाळा संपला होता. वातावरण साफ होतं. स्वच्छ सूर्यप्रकाश अंगाभोवती लपेटून घेतलेल्या छपरातून, कौलांच्या फटीतून सूर्याची चुकार किरणं भुईवर सांडत होती. घरातील धूर आणि धुळीत या प्रकाशाचा कवडशाचा खेळ आम्ही खेळत असू. फुटल्या आरशाचा तुकडा या कवडशात धरला की भिंतीवर छान परावर्तीत प्रकाश दिसे. आम्ही असे प्रकाशाचे तुकडे घरभर नाचवत असू.

एका दिवशी आई आंघोळ करीत होती. आमची न्हानी म्हणजे दरवाजा जवळ एकेक विटांचे आळे केलेले असे. दरवाजा बंद केला की त्याचीच न्हानी होई. त्यामुळेच घरातल्या कळत्या मुलांना घराबाहेर काढून मग आईला आंघोळ करावी लागे. तर आई आंघोळ करीत होती. तेवढ्यात दाराबाहेर मळ्यातले पाहुणे आले. दाराची कडी वाजवत त्यांनी विचारले, ‘मास्तर आहे का?’ त्यावर ‘ते’ नोकरीच्या गावी असल्याचे आईनं सांगितलं. मग पाहुणे म्हणाले, ‘मास्तरांना कौल दिली होती. आठ दिवसात परत करायला सांगितली होती. सारा पावसाळा संपला तरी कौलं दिली नाही आणि वर मास्तरनी तोंड काळं केलं.’ त्यावर आई आतून म्हणाली, ‘ते आले की त्यांना सांगते.’ त्यावर दाराच्या फटीतून दिसणारा माझ्या आईचा देह पाहण्याचा प्रयत्न करीत पाहुणे उद्गारले, ‘साईत्रे (माझ्या आईच्या नावाचा अपभ्रंश) मास्तरांना आल्यावर मळ्यात पाठवून दे. म्हणावं कौलं आणून द्या नाहीतर घरावरची सारी कौलं काढून नेईल. मग तुला रस्त्यावर आंघोळ करावी लागल.’ पाहुण्यांचे शब्द ऐकताच आईच्या अंगावर जणू वीज कोसळली. ती आंघोळ करीत असताना कौलांच्या फटीतून सांडलेला कवडसा तिच्या अंगावर पडला होता. आईनं हा कवडसा हाती धरला अन् त्याच्यावर आसवांचा पाऊस पाडत तो काजळव्रण मनावर गोंदून घेतला. पुढे वडील घरी आल्यावर त्यांनी पाहुण्यांची कौलं परत दिली; पण आई मात्र आयुष्यभर कौलातून सांडलेल्या कवडशाच्या काजळव्रणाचा दाह सोसत राहिली मूकपणे.

मग मी शहरात माझं घर बांधलं. आईनं जातांना तळहातावर ठेवलेला काजळव्रण मी आता माझ्या घराच्या छपरावर चिटकवलेल्या चांदण्यांशेजारी डकवून ठेवला आहे. रात्र अंधारल्यावर छतावर चिकटवलेली नक्षत्र चमकतात. आणखी थोडं वर बघितलं तर उत्तरेला एक मंदसा तारा प्रकाशताना दिसतो. तो तारा म्हणजेच माझी आई. मी तिच्याकडे बघतो. छपरावर डकवलेला तो काजळव्रण मला खूपत जातो. अंगावर दुलई ओढून घेतल्यावर मग मी जेव्हा रडतो तेव्हा आईच्या सयीची साय गहिरी होत माझ्या अंगोपांगी घट्ट चिकटते. मी लहान होत गावाकडच्या कुडाच्या घरात जातो. आईच्या अंगावर पडलेला कवडसा मुठीत धरण्याचा प्रयत्न करतो. कवडसाच तो, हाती काही लागत नाही. काळजातून वाहू लागलेल्या वेदनास्रावावर ओलसर, सर्द भिंतीचा पापुद्रा खरडवून चिकटवतो अन् माझ्या शहरातल्या घरात आईच माझ्यावर दुलई टाकते आहे, असे समजून घेत छताला चिकटवलेले चांदणे पांघरूण घेतो...

■


iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**किरण लोखंडे**

एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८

**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०



# अंतिम सत्याच्या शोधात हरवलेलं ब्रह्म

- अशी मरणं आणि अभंग अनुभवल्यानंतर मी जेव्हा स्मशानातून घरी आल्यावर शुचिर्भूत होऊन माझ्या खोलीच्या कोपऱ्यात नेहमीप्रमाणे चारही भिंतींचा काळोख पांघरूण बसतो तेव्हा भोवती पुन्हा जन्ममरणाचे प्रश्न फेर धरतात. खरंच जन्म म्हणजे काय? पुनरुत्पादनाची प्रक्रिया की, नैसर्गिक, अनैसर्गिक, नैतिक, अनैतिक संबंधातून निर्माण होणारा आणखी एक बंध? की निसर्गाचा एक अपघात? बरं जन्माला येऊन आपण काय करतो? तर फक्त जगत राहतो ते मरण येईस्तोवर. या दरम्यानचा काळ म्हणजे आयुष्य. जे आपलं स्वत:चं असं कधीच नसतं. आई-बाप, बहीण-भाऊ, बायको (नवरा) आणि अपत्यं हे असंच चक्र अव्याहत सुरू असतं. या साऱ्यांच्या आशा, अपेक्षांच्या पूर्तींचे कर्तव्य, जबाबदाऱ्या पार पाडत अन् कमरेवरची पोकळी भरत आपण चालत राहतो.

# २ अंतिम सत्याच्या शोधात हरवलेलं ब्रह्म

चारी दिशा अंधारानं गिळाव्यात, वाऱ्यानं हलणारं पान गोठून जावं, रातराणीच्या झाडावरली फुलं मुकी व्हावीत, दरीत घुमणारी शीळ चुप राहावी, आकाशाच्या कातळ देहावर उस्कटलेल्या निळ्याशार मेघांच्या काजळकडांमधून डोकावणारा चांदाचा इवलासा तुकडा निस्तेज होऊन झाकोळून जावा, चांदण्यांनी आपलं गाणं बंद करावं, सागरानं आपलं गुज गप्प करावं, त्याच्या किनाऱ्यावरल्या नारळाच्या झाडांनी अंग चोरावं या आणि अशा कातरवेळी जेव्हा कुत्री वर तोंड करून विव्हळतात तेव्हा मृत्यू नावाचं एक अंतिम सत्य घोंघावत असतं. मी अशी चार-पाच मृत्यू अनुभवली आहेत, पाहिली आहेत आणि माझ्या मानगुटीवर बसलेल्या प्रश्नवेताळाची कोडी सोडविण्यासाठी माझं ब्रह्म कपाळावर गोंदीत त्या अंतिम सत्याच्या शोधाच्या प्रवासाला निघालो आहे...

'ब्रह्मं सत्यं जगत् मिथ्या !' असं म्हणतात. जग हे खोटं आहे तर मग सत्य आहे तरी काय? मायेचा बाजार की, मोहाची अवजड बेडी? माणूस जन्माला का येतो? जगतो कशासाठी? का मरतो? मेल्यानंतर तो जातो कोठे? हे सारे - सारे प्रश्न एकांताच्या स्मशानात जेव्हा मी मृत्यू अनुभवित असतो तेव्हा भोवती फेर धरतात. मी पामर, बापुडवाणं, साधुसंताच्या अलौकिक वाणीचा स्पर्श घेऊ पाहतो पण, कोरडं, सारं काही कोरडंठाक. पाण्यात उतरल्यावरही ओंगाळवाणा देह तसाच राहावा, सुकलेला तसं...

नुकतंच जगात आलेलं कोवळं लुसलुशीत अर्भक. डोळे उघडण्यापूर्वीच त्याचे प्राण मिटून जातात. असं कित्येकदा घडतं. जर ते मुल जगावं अशी त्या जगन्नियंत्याची इच्छा नसेल तर मग का जन्माला घालतो त्याला? जर खरंच चौऱ्याऐंशी लक्ष योनींचा फेरा घालण्याच्या चक्रातलं हे एक वर्तुळ असेल तर ते प्रारब्ध कोणाचं? मुलाचं की, आई बापाचं?

तर ते इवलसं बाळ तळहातावर फुलासारखं जपत, त्याच्यावर आसवांचे दवबिंदू शिंपडत त्याचा बाप जेव्हा ते कलेवर घेऊन स्मशानात येतो तेव्हा मी माझ्या हातांनी त्या बाळाच्या चिरनिद्रेसाठी खड्डा खोदत असतो. त्यात बाळाला पुरून टाकल्यावर त्यावर मोठा दगड ठेवतो. काय खरं? बाळाचं जन्माला येणं, त्याचं लगेच मरणं की, त्याला खड्ड्यात पुरणं? तो खड्डाच खरा ! बाकी सारं मिथ्या !

माझा एक जवळचा नातेवाईक. बायको-पोरांचा धनी झाल्यावर एका बेहोशीच्या क्षणी आत्मघात करून या नातेवाईकानं मृत्यूचं अंतिम सत्य स्वीकारलं. भर दुपारी जेव्हा आकाशात तो तप्त गोळा अवघी पृथ्वी भाजून काढीत होता, त्यावेळी या नातेवाईकानं पेट्रोलचा अभिषेक करीत स्व:देह पेटवून दिला. त्याला जेव्हा दवाखान्यात आणलं तेव्हा मी तेथे धावत गेलो. अंगाचा दाह होत असताना, करपटलेल्या कातडीचा उग्रवास लपेटून घेतलेला त्याचा चेहरा विद्रुप झालेला. अनोळखी कोणी असावा तसा. माझा हात हाती घेऊन मोठ्या कष्टानं म्हणाला होता, 'आई-बापानं का जन्माला घातलं मला? आतापर्यंत जगलो कशासाठी'? ... या प्रश्नांची उत्तरं शोधायला मग तो निघून गेला, कायमचाच...

माझा बाप ७०-७४ वर्षांचा. आम्हा भावंडांना सहा लाखाची इस्टेट समजायचा. उभं आयुष्य मास्तरकी करीत दारिद्र्यात काढलेल्या बापाला उत्तर आयुष्यात सुखाचे चार दिवस बघावे, अशी इच्छा होती. मलाही त्याला चौसपी वाड्यात चोपाळा टांगून द्यायचा होता. चोहोबाजूंनी नातवडांचं गोकुळ डोळ्यात साठवत बापानं एक दिवस डोळे मिटले. तत्पूर्वी माझ्याशी बोलताना बाप म्हणाला होता, 'आता परमेश्वरानं जास्त जगू देऊ नये. देहाचे धिंडवडे निघण्यापूर्वीच त्याचं बोलावणं आलं पाहिजे. देह सोडताना आत्म्याला बिल्कुल त्रास होऊ नये, यासाठी तू प्रार्थना कर.' मी अशी प्रार्थना करू कशी? देव म्हणेल, 'काय रे बापाची सेवा करण्याचा कंटाळा आला काय?' पण, माझ्यावर तशी वेळ आलीच नाही. परमेश्वरानं लवकरच बापाला आपल्या घरी बोलावणं धाडलं. बापानं जन्माला येऊन केलं काय? साधं घरदेखील बांधू शकला नाही. आम्हा भावंडांना जन्माला घातलं, बस्स. मग मला प्रश्न पडतो, सत्य काय? बाप, त्याचं जगणं, त्याचं मरणं की त्याचं आम्हाला जन्माला घालणं?

अगदी परवा परवा पुन्हा जवळचाच एक नातेवाईक स्वर्गवासी झाला. हा माणूस हरीचा भक्त होता. आयुष्यभर गळ्यातल्या तुळशीच्या माळीचं पावित्र्य जपणाऱ्या आणि भल्या पहाटे स्नानादि कर्म आटोपून देवपूजेत मग्न राहणाऱ्या या हरिभक्ताला शेवटी शेवटी देहाचं यंत्र चालू ठेवण्यासाठी मांसाहार करावा लागला. पूर्वायुष्यात 'वशाट'पाणीही न ओलांडणाऱ्या या माणसाला त्याच पाण्यानं तहान भागवावी लागली. याच विषण्णेत की घरच्यांनी, भाऊबंदकीच्या वादातून वेगळं काढल्याच्या रोषानं या माणसानं प्राणत्याग केला. त्याचा अंत्यविधी सुरू असताना त्याच्या मुलानं सवाल केला, 'माणूस जन्माला का येतो आणि जगतो कशासाठी'?

# अंतिम सत्याच्या शोधात हरवलेलं ब्रह्म

शेजारी राहणारा एक कामगार, त्याची तर गोष्टच आणखी वेगळी. कामगार नेता असणाऱ्या या माणसाचं मानसिक स्वास्थ्य ढासळलं. आपण वेडे आहोत याचा दाखलाच त्यानं कंपनीला सादर केला. कामातून सुट मिळाली, पण सहकाऱ्यांच्या दृष्टीने तो वेडा ठरला. त्याच्याकडं पाहून हसणाऱ्यांची संख्या वाढत गेली मग तो आणखीच वेडा झाला. दारू पिल्यावर बायका-पोरांना मार-मार मारणाऱ्या अन् घरातल्या वस्तूंची मोडतोड करणाऱ्या या माणसानं आयुष्यात चार वेळा विष प्याले वा किमान तसं नाटक तरी केलं. पण शेवटचा त्याचा प्रयोग मात्र फसला. विष अन् दारूचे एकत्रित प्रमाण जीवघेणं ठरलं. या माणसानं जन्माला येऊन केलं काय? आईलाही मारलं, दारूत पैसे उडविले. दोन पोरांना जन्माला घातलं अन् शेवटी काळीज जाळत मेला. पुन्हा प्रश्न, काय खरं? जगणं की मरणं?

मग इतकी मरणं पाहिल्यावर अशा मरणक्षणी अभंग जन्माला आला, तो असा-

जगणे जगावे, मरण लाजावे ॥१॥
आयुष्याचे दावे, तोडू नये?
जगणे जगणे, नियतीचा खेळ
कसा घालू मेळ, कळेचिना ॥२॥
जगता जगता, लोंबली कातडी
जगण्याची गोडी, संपलेचि ॥३॥
जगण्याला आता, कशाचा आधार
अपेक्षांचा भार, पेलवेना ॥४॥
जगणे जगता, तुटतात टाके
आकाश फाटके, थिगळांचे ॥५॥
ठेवावा कसा, कोणावर भरोसा
पडतो हा फासा, उलटाचि ॥६॥
कुजला कुजला, वासनेचा डोह
जगण्याचा दाह, सोसवेना ॥७॥
जगणे-मरणे, ब्रह्म्याचे दप्तर
देहाचे लक्तर, फेकावे ॥८॥
कपाळी गोंदला, सटवीचा लेख
जगण्याचा झोक, सांभाळेना ॥९॥
जगणे जगता, नासली ही कुडी
मरण्याची वेडी, आशा आहे ॥१०॥
नको नको आता, सजवू हा देह
जगण्याचा मोह, खरा नव्हे ॥११॥
सत्य हेचि अंती, आहे चिरफाड
व्यर्थ रडारड, कशासाठी ॥१२॥
कशासाठी आता, गावे हे अभंग
जगण्याचा संग, बरा नव्हे ॥१३॥

- अशी मरणं आणि अभंग अनुभवल्यानंतर मी जेव्हा स्मशानातून घरी आल्यावर शुचिर्भूत होऊन माझ्या नेहमीच्या कोपऱ्यात नेहमीप्रमाणे चारही भिंतींचा काळोख पांघरूण बसतो तेव्हा भोवती पुन्हा जन्ममरणाचे प्रश्न फेर धरतात. खरंच जन्म म्हणजे काय? पुनरुत्पादनाची प्रक्रिया की, नैसर्गिक, अनैसर्गिक, नैतिक, अनैतिक संबंधांतून निर्माण होणारा आणखी एक बंध? की निव्वळ एक अपघात? बरं जन्माला येऊन आपण काय करतो? तर फक्त जगत राहतो ते मरण येईस्तोवर. या दरम्यानचा काळ म्हणजे आयुष्य. जे आपलं स्वत:चं असं कधीच नसतं. आई-बाप, बहीण-भाऊ, बायको (नवरा) आणि अपत्यं हे असंच चक्र अव्याहत सुरू असतं. या साऱ्यांच्या आशा, अपेक्षांच्या पूर्तीचे कर्तव्य, जबाबदाऱ्या पार पाडत अन् कमरेवरची पोकळी भरत आपण चालत राहतो.

आयुष्य म्हणजे असतं काय?
वितभर पोटासाठी धावणारे दोन पाय !

- हे सत्य अधिक उमजावं म्हणून मी माझ्या दोन पायांवर पाठीशी पोट टांगत धावत राहतो. कपाळावर रेखलेलं ब्रह्म सांगेल, त्या दिशेनं फक्त धावत राहतो. कधी धडपडलो तर आपणच आपलं सावरत, पुन्हा धावतो. जेव्हा थांबतो तेव्हा, माझा अंतिम श्वास भोवती रेंगाळत असतो. विदीर्ण कातडीवरच्या शुष्क रेषांनी आवळत जाणारा माझा अखेरचा श्वास मी सोडतो तत्क्षणी अंतिम सत्याच्या शोधात हरवलेलं माझं ब्रह्म मृत्यूच्या महाद्वाराशी हसत माझं स्वागत करीत असतं. त्याच्याकडं झेपावतो तेव्हा हे ब्रह्म त्याच्या अलिंगणात मला अगदी विरघळून टाकतं आणि इकडं पार्थिव झालेल्या शवावर अंतिम संस्कार सुरू असताना माझ्याच अंशाला कोणीतरी विचारत असतो, 'माणूस जन्माला का येतो? जगतो कशासाठी?'

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०



# पच्चास पैसा जब पेटसे गाना गाए

हैं. खाली पेट तो आदमी को क्या
पापी पेट के लिए सर, हम अपनी अलगही
सामने पेश करते है । सर, ऐसी कला आप इससे पहले
कही नही देखी होगी. माईबाप, हम से गाना गायेगें, पेटसे
गाना बजाएंगे, देखो सर, इस पेट का सवाल है. हम
अपने हातोंसे पेट और को ऐसे बजाएंगे की उनमेसे गाना
बाहर आएगा, देखिए इस कला को और कदरदान,
मेहरबा भाई आपके पास आयेगा, उसके झोली मे
एक- रुपय्या डालिये. तो लो सरकार, हम अपनी कला पेश
करने जा रहे है'...

# ३ पच्चास पैसा जब पेटसे गाना गाए

अस्थींच्या पिंजऱ्यावर असलेल्या देहाला झाकणाऱ्या कातडीचा ढोल करून बडवावा, खाचा झालेल्या डोळ्यांच्या खोबणीतून बुबुळ ओघळावीत अन् नाकापर्यंत उलट्या भिडलेल्या ओठातून व्याकुळ गाणं वाजवावं म्हणजे मग वितभर पोटाचा हातभर खड्डा भरून जातो... आता हे सारं आठवायचं कारण म्हणजे मुंबईत लोकलमध्ये भेटलेले ते दोन भाऊ...

छत्रपती टर्मिनसकडून ठाण्याला येण्यासाठी लोकलमध्ये बसलो. नेमके त्याचवेळी पाठोपाठ दोन जण याच डब्यात शिरले. त्या दोघांमध्ये एक मोठा, थोराड अंगाचा. दुसरा लहानखुरा. दोघेही उघडेबंब. लाज झाकायला असावी, म्हणून विरलेली अर्धी चड्डी. बाकी सारं अंग कातळासारखं. अंगावर कधी काळी पडलेल्या पाण्याचे सुकलेले ओघळ, अनवाणी पायांना पडलेल्या मोठमोठ्या चिरा, फुटलेली, रक्ताळलेली हाताची बोटं. त्यापैकी मोठ्याचा वरचा ओठ चिरल्यामुळं नाकाला भिडलेला अन् लहान्याचे डोळे खोबणीत खोलवर रुतलेले.

चिरक्या ओठाचा आपल्या गेंगाण्या आवाजात म्हणू लागला, 'इस डिब्बे मे बैठे हुए भाई और बहिनों, हम तो छोटे कलाकार है। आपने कई कलाकारोंको देखा होगा जो अपनी कलाए आपके सामने पेश करते होंगे. कोई मुँहसे गाना गाता है, कोई सिट्टीसे बजाता है, तो कोई किसी वाद्यसे आपका मनोरंजन करता होगा. सर, लेकीन आपने कभी पेटसे बजा हुआ गाना नही सुना होगा. माईबाप, हे पेट बहुत बुरा होता है. खाली पेट तो आदमी को क्या से क्या नही करवाता. इस पापी पेट के लिए सर, हम अपनी अलगही कला आपके सामने पेश करते है । सर, ऐसी कला आपने इससे पहिले कही नही देखी होगी. माईबाप, हम पेटसे गाना गायेगें, पेटसे गाना बजाऐंगे, देखो सर, इस पापी पेट का सवाल है. हम अपने हातोंसे पेट और कंधोको ऐसे बजाऐंगे की उनमेसे गाना बाहर आएगा, सर देखिए इस कला को और कदरदान, मेहरबान, मेरा भाई आपके पास आयेगा, उसके झोली मे एक-दो रुपय्या डालिये. तो लो सरकार, हम अपनी कला पेश करने जा रहे है'...

असं दोनदा म्हणत त्या थोरल्यानं थोडी विश्रांती घेतली. लहान्याकडं रोखून पाहिलं. मग गाणं वाजवायला तयार झाला. दोन्ही पाय एकमेकांपासून दूर सरकवले. दोन्ही हातांना हवेत एक-दोनदा हेलकावे दिले अन् चपदिशी आपल्या पोटावर व खांद्यावर या दोन्ही हातांनी ठेका देत बडवायला सुरुवात केली. देहाच्या कातडीचा अजब ढोल तो कसा वाजवतो याची उत्सुकता होतीच. त्यानं वाजवायला सुरुवात केल्यावर मी निरखून पाहिलं. जिथं हाताचा मार बसायचा ती पोटाची अर्धवर्तुळ कातडी अन् खांद्याजवळची त्वचा सुजलेल्यामुळं चांगली उठून दिसते. सततच्या मारामुळं मूळपेक्षा किंचित फुगलेली त्याची ती काळसर, रक्ताळलेली कातडी पाहिल्यावर अंगावर शिरशिरी उठली. 'बाबारे हे पाच रुपये घे; पण स्वत:ला असं मारून घेऊ नको' असं सांगायचं ओठावर आलं; पण धीर झाला नाही. डोळे मिटून मी त्याचं ते 'पेट बजा के गाना' ऐकत राहिलो. पाच मिनिटांनी तो थांबला. त्याचा लहान भाऊ पैसे गोळा करण्यासाठी डब्यात फिरला. मी नकळत खिशातून त्याला दोन रुपये काढूनही दिले. त्यानं गाण वाजवणं थांबविल्यावर एक गलेलठ्ठ शेट त्याच्याजवळ गेला, म्हणाला 'दिन में कितना कमाते हो?'

'तीस-चाळीस रुपया'

'एकही बार इतना पैसा कमाना चाहते हो?'

'कैसे'

'देख, तू तेरी ऐसी कलासे पेटपर अगर 'ढोली तारो ढोल बाजे' यह गाना बजाऐगा तो मै तुझे पच्चास पैसा दुंगाँ'

'क्या शेठ, मजाक करते हो, सिर्फ पच्चास पैसा?'

'अरे नही, ये गाना गाते वक्त जितनी बार तू पेट बजाते हुऐ ढोल जैसी आवाज निकालेगा उतनी बार पच्चास पैसा, तू चाहे तो पाच मिनिट में पच्चीस रुपये कमा सकता है ।'

त्यांचं हे बोलणं सारा डब्बा ऐकत होता. आता तो थोरला काय करतो याकडं साऱ्याचं लक्ष लागून होतं. 'सुनिये माई-बाप, 'अब हम ढोली तारो ढोल बाजे' यह गाना पेटसे गाते है. ये मेहरबान सर बडे कदरदान है. जो यह ढोल के आवाजपर पच्चास पैसा देणेवाले है । आपसे बिनती है की आप भी ये गाना सुने, हो सके तो आप भी थोडा पैसा निकाले, माई-बाप ये पापी पेट का सवाल है।' असं म्हणून थोरल्यानं गाण्याची तयारी केली. आसूड ओढावेत तसं दोन्ही हात हवेत हलत त्याच्या स्वत:च्या अंगावर वेगानं आदळू लागले. गेंगाण्या आवाजात गाणं म्हणत गाण्यात ढोलचा उल्लेख आल्यावर पोटावर आणखी जरा जोरात हात मारू लागला. चटपचटपच्या लयबद्ध आवाजात 'ढोल'सारखा आवाज शोधत तो शेठ प्रत्येक वेळी पन्नास पैसे त्याच्या भावाच्या ओंजळीत टाकीत राहिला...

असेच तीन-चार मिनिट गेली. थोरला थकला, प्रचंड थकला. दोन्ही हात खपकन् पोटावर दाबत खाली बसला.

पान दोन पाहा

# पच्चास पैसा जब पेटसे गाना गाए

त्याचं सर्वांग थरथरत होतं. तेवढ्यात गाडीचा वेगही मंदावला. कुर्ला स्टेशन आलं. डब्यात शिरणाऱ्यांच्या गर्दीत चेंगरत तो अन् त्याचा धाकटा भाऊ गाडीतून खाली उतरले. धावत, काहीसा अडखळत थोरला गर्दीतून निघून एका बाकड्याचा आधार घेऊन बसला. क्षणार्धातच त्यानं सततच्या मारामुळं ढवळलेल्या पोटातून आलेल्या रक्ताची उलटी केली...

- मी घरी आलो खरा; पण लोकलमधील हा प्रसंग काही केल्या डोळ्यासमोरून अंधारात जाईना. सारं मन गुंडाळून घेतल्यावरदेखील देहाच्या कातडीच्या ढोलाचा आवाज येत राहिला. कितीतरी वेळ...

✻ ✻ ✻

या गोष्टीला चार-पाच वर्षे उलटून गेलीत. काल परवा ऑफिसच्या कामासाठी मुंबईला जावं लागलं. तीच सकाळची पंचवटी एक्स्प्रेस पकडली. छत्रपती टर्मिनस येईस्तोवर चेहऱ्यावर लाचारीची परिसीमा असणारे अनेक हात पुढे आले. त्यास अधून-मधून करुण गाण्याची साथ होतीच. मनमाडहून बसलेला एक सुरदास कसाऱ्याला उतरला. त्याच्या हातातल्या डब्यातील उष्टावलेल्या आंबुस पाववड्यांवर त्यानं अन् त्याच्या अपंग मित्रानं ताव मारला. एक गर्भारवाशीन देवीच्या व्रणांनी चेहरा झाकलेल्या आपल्या अंध नवऱ्याचा हात खांद्यावर टेकवून त्याला आधार देत पेटी वाजवित आली. तिला एक लहान मुलगा दगडांच्या चिपळ्यांची साथ देत होता... असे कितीतरी हात माझ्यासमोर आले. मी काहीच्या ओंजळीत पैसे टाकले. कधी-कधी चेहरा फिरवून घेतला. लक्ष नाही असं दाखविण्यासाठी मी जेव्हा खिडकीतून बाहेर डोकावलो तेव्हा माझ्या डोळ्यासमोर लोकलमध्ये भेटलेल्या त्या दोन भावांचा चेहरा लखकन् तरळून गेला. अजूनही उघड्या पोटावर त्यांचे हात आदळत असतील? त्यातून निघणाऱ्या चटपचटप आवाजानं पोटातून गाणं येत असेल?

✻ ✻ ✻

मुंबईचं काम आटोपून अंधेरीला निघालो. दुपारची वेळ असल्यामुळं लोकलमध्ये फारशी गर्दी नव्हतीच. अचानक 'रुमाल लिजिऐ, पसीना भगाऐ' असा आवाज आला. कधी काळी अशाच प्रकारचा आवाज कानावरून गेल्याचा भासही झाला. आसनावरून उभं राहून पुढं बघितलं. तर दिसला, मागं भेटलेल्या धाकट्यासारखाच चेहरा ! की हाही भासच? नको असतानाही त्याला आवाज दिला.' बोलो साब, कोनसा रुमाल चाहिए?' त्यानं विचारलं. उगाचच कापडातलं आपल्याला खूप काही कळतयं असं दाखवित आणि किंमत विचारीत एक रुमाल घेतला. म्हटलं, 'एक बात पुँछनी थी. गुस्सा तो नही करोगे? त्यानं उत्तर दिलं, 'नही साब, गुस्सा किस बात का?' मग मी त्याला त्या दोन भावांची गोष्ट सांगितली. त्यातला धाकटा तुझ्यासारखाच दिसत असल्याचंही म्हटलं. त्यावर तो हसला. म्हणाला, 'साब, मै वही हूँ. वो जो मेरा बडा भाई था ना. वो मर गया. एक बडे साहबने उसे ढोल का आवाज निकालने के लिए कहा था. अपने पेट पर हात चलाते हुए वो इतना थक गया की उसी मे उसकी जान चली गई... उसके बाद मैने भीक माँगना बंद किया. दादर की एक संस्था है. जिन्होने मुझे कुछ पैसे दिए. और फिर मैने यह धंदा चालू किया. अब अच्छा गुजारा चल रहा है....

गाडी थांबली. रुमालवाला खाली उतरला अन् झटक्यात दुसऱ्या डब्यात शिरला. माझ्या डोळ्यासमोर आता काही चित्रांचे कोलार्ज तयार झाले होते. उघड्या पोटावर चटाचट हात मारीत गाणं म्हणणारा गेंगाण्या, त्याला साथ देणारा धाकटा अन् आता रुमाल विकणारा. लोकलच्या म्हणा वा आयुष्याच्या प्रवासातला शिनवटा एका साध्या रुमालानेही पुसता येतो हे सांगणारा ! हाती काही नसलं तरी याच हातानं आपलं नशीब लिहिता येत असं म्हणतात. रुमाल विकणारा त्याचंच तर उदाहरण नसावं?

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०



# वासनाभ्रमाचे चक्रवाचक्र

… खानी

रडला तेथ … ती

ओरखडून पाहत असतो. थो… मल… तात मामा

तिला तळहातावर पसरवतो. त्यावेळी

दिसतो. 'मी तसं काहीचं केलं नव्ह…', असं ओरडून

सांगणारा जीर्ण झालेला मामा… ह मला त्या मातीत दिसत

असतो. मग प्रश्नांच्या … माझा मेंदू कुरतडू लागतात.

अंगावरची का… शुष्क झाल्यावर मामाची वासना जिवंत

झाली … का? त्याच क्षणी त्यानं खरचं सुनेचा हात

धरला असावा का? की तिनंच कांगावा करून तिच्या

नवऱ्याला भरीस घातलं असावं? पण मला पक्की खात्री आहे.

# ४ वासनाभ्रमाचे चकवाचक्र

नासलेल्या देहाचे बंध तोडून वळवळणारे किडे रस्ताभर नाचून, चिरडून जावेत अन् वासनाडोहात तडफडणाऱ्या आत्म्याचे कलेवर ओसाड सागर किनाऱ्याच्या तप्त वाळू कणांवर भाजून निघावे, म्हणजे मग माणूस हा शुद्ध प्राणी होतो... शुद्ध-अशुद्ध या तशा हास्यास्पद कवी कल्पना असतात का? नसतील तर मग आयुष्यभर शुद्धतेची साधन-सुचिता पाळणाऱ्याच्या अंताला कारणीभूत का ठरावा, तथाकथित वासनेच्या विषारी दंतव्रणांचा अभिशाप? खरं म्हणजे प्रेम हा वासनेचाच आविष्कार नसतो का? बहुतेक असावाच, त्याशिवाय का काळ अंधारात सजलेल्या कामक्रीडेतून जन्माला येणाराच नीती अन् नियतीला लाजवेल असे बेछुट किटाळ जन्मादात्यावर लादतो?

मेंदूच्या मुंग्या व्हाव्यात अशा प्रश्नांची उत्तरं मी शोधण्याचा वृथा प्रयत्न नेहमी करत असतो. अशाच पैकी हादेखील एक प्रश्न.

बायकोच्या पदराला हात घालण्याचं गरळ मुलानं बापावर ओतल्यावर त्या बापाचा देह सापांनी डसल्याप्रमाणं छिन्नविछिन्न होणार नाही का? मग त्या बापानं हाडांना झाकण्यासाठी असलेल्या कातडीचा ढोल करून द्वाही फिरवली तर त्यावर आपण विश्वास का ठेवू नये? मी ठेवला, कारण माझी तशी पक्की खात्री होती. थकलेल्या, त्रासलेल्या मनाचा तोल सांभाळण्याची कुवत त्या बापात नक्कीच होती. पण मुलानं अंगावर फेकलेल्या किटाळामुळं तो खचला अन् आपलं अर्ध अंग संवेदनहीन जाणिवांना दान करून लुळा-पांगळा झाला. हे असं का व्हावं? हे सारं वासनाभ्रमाचं चकवाचक्रचं असावं का?

ओंजळीतून निसटलेल्या क्षणांच्या अंगोपांगी माझ्या मोठ्या मामाची आठवण दाटलेली आहे. अजूनही जेव्हा जेव्हा मामाच्या गावाला जाऊन त्याचं पत्र शोधतो, तेव्हा तेव्हा खाटेवर क्षीण होऊन पडलेला मोठा मामा दिसतो. माझ्या आईचा हा सख्खा भाऊ. आईपेक्षा मोठा, आई अन् या मामाच्या चेहऱ्यात पटकन लक्षात येईल असं साम्य होतं. तसं पाहिलं तर लहानपणी मी कधी मामाच्या गावात फारसा रमलो नाही. लहान मामा हा मोठ्या मामाचा चुलत भाऊ, पण त्यांच्यात सख्ख्या भावांना लाजवेल असं प्रेम होतं. पुढे ते दोघं वेगळी निघाली, तरी एकाच घराचे दोन भाग करून ते राहत होते. बाहेरून एकच दिसणारं अन् एकच ओसरी असणारं पण दोन चुली पेटणारं ते घर माझ्या डोळ्यासमोरून हलता हलत नाही. दुमजली घराला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी दोन्ही मामांच्या घरातून दोन जिने होते. काळ प्रवाहात ओसरीचेही दोन स्वतंत्र भाग झाले. लहान मामाचं घर एकच राहिलं पण मोठ्या मामाच्या घराचे मात्र चार तुकडे झाले. त्याच्या प्रत्येक पोरानं घराचा कोपरा वाटून घेतला. ही गोष्ट मामा मेल्यानंतरची खरी, पण त्याची सुरुवात तो जेव्हा अर्धांगवायूच्या झटक्यानं खिळला तेव्हापासूनच झाली होती.

मामा आजारी असल्याचा निरोप मिळाला, तो नेमका माझ्या लग्नाच्या वेळी. लग्नात माझ्यामागं लहान मामा उभा राहिला होता. लग्नानंतर शहरात घर थाटल्यावर, निवांत झाल्यावर नव्या कोऱ्या बायकोबरोबर मामाला भेटायला गेलो होतो. त्याला देण्यासाठी पावशेर पेढे घेऊन! मामाच्या मोठ्या घराच्या मागच्या पडवीत पुर्वी जिथे गुरांचा गोठा असावा तेथेच शेजारी एका तुटक्या खाटेवर मामाचा देह सांडलेला होता. मला पाहिल्यानंतर त्याचे डोळे काहीसे थराथरले असावेत. संवेदनाहीन झालेल्या हाताकडं निर्जीव पाहून त्यानं दुसऱ्या हातानं माझा हात हाती घेतला होता. डाव्या बाजूनं ओघळणाऱ्या तोंडातल्या लाळेबरोबर त्याचे शब्दही थांबून थांबून सांडत होते. त्याचे शब्द ओंजळीत धरण्याचा मी प्रयत्न करीत होतो. मी खूप दिवसांनी भेटलो होतो. त्याला खूप काही सांगायचं असावं; पण मनातलं गळ्यात अन् गळ्यातलं ओठांवर आणण्यासाठी मामाला करावे लागणारे श्रम पाहून माझेही डोळे डबडबले अन् तोंडातून शब्दच उमटत नसल्यानं मग मामाचे डोळेच बोलू लागले. असाह्यपणे ओघळू लागले. मामीनं मळकट फडक्यानं मामाचे डोळे पुसले अन्, ‘रडू नका रडू नका’, असं म्हणतानाच ‘हे याचं दररोजचं झालं आहे’, असं मला सांगितलं होतं. थोडा वेळ थांबून निघालो, तेव्हा ‘जाऊ नको’ म्हणून घट्ट पकडलेला हात हळूवारपणे सोडून मी दाराबाहेर पडत असतानाच मामाच्या आर्त हाकांनी पाय अडले होते. ‘नन्या ही तुझी-माझी शेवटची भेट रेऽऽ’, असं अडखळत का होईना मोठ्या कष्टानं त्यानं फोडलेला टाहो अजूनही माझा पाठलाग करीत असतो.

मामा म्हणाला तसंच झालं. ती त्याची माझी शेवटचीच भेट. सिरियस असल्याचा निरोप आल्यानंतर मामाच्या गावाला निघालो तेव्हा भाबड्या मनाची आशा जिवंत असावी म्हणून त्याला पिण्यासाठी शहाळ घेतलं पण जेव्हा तिथे पोहचलो तेव्हा त्याच्या शेवटच्या यात्रेची तयारी सुरू होती. त्याला भेटण्यासाठी आठ दिवसांपूर्वी गेलेली आई नि:शब्द पुतळा होऊन बसली होती. मी तिला मिठी मारल्यावर मग तिचा बांध सुटला होता. एकीकडं मामाचा देह सरणावर निवांतपणं जळत असताना दुसरीकडं बाया माणसं रडत

पान दोन पाहा

होती. रडताना मामाची लेक लयबद्धपणे त्याची थोरवी गात होती अन् एका लेकानं त्याच्यावर घेतलेला आळ कसा खोटा होता हे सांगत होती. तिसरीकडं माणसंदेखील हाच विषय चघळीत होती. एका मुलानं मामावर बायकोचा हात धरल्याचा आरोप करून त्याला चांगलच मारलं होतं हे तेव्हा मला समजलं. या मारहाणीतच मामाला अर्धांगवायूनं घेरलं होतं. हा माझ्यासाठी मोठा धक्काच होता. त्यातून मी अजूनही सावरलेलो नाही.

तसं मला मामांविषयी फारशी आस्था, प्रेम वगैरे काही नव्हतं. लहानपणी मी मामाच्या गावाला फारसा रमलोच नाही. एकदा यात्रेला गेलो तेव्हा लहान मामानं २५ पैसे खर्ची दिल्याचं अन् मोठ्या मामानं खाऊ घेऊन दिल्याचं माझ्या लक्षात आहे. मी कधी मामाच्या गावी फारसा गेलो नसलो तरी मोठा मामा मात्र नेहमी आमच्या घरी येत असे. तो आला की, आई त्याला हमखास शेवयाचा भात ओतायची. एका ताटात शेवया अन् गुळाचा खडा टाकलेला. सोबत उडदाचा पापड भाजून द्यायची. मामा आला की, माझे वडील त्याची मनसोक्त थट्टा करायचे. मामा झोपला की, खूप मोठ्यानं घोरायचा ही त्याची माझ्या लक्षात राहिलेली आणखी एक आठवण. मामा मेला अन् ही सारी स्मृतिचित्रे धूसर धूसर होत गेली.

मी अजूनही कधीतरी मामाच्या घरी जातो. आता तेथे प्रचंड बदल झाले असले, तरी ज्या ठिकाणी मामा शेवटचा रडला तेथे त्याच्या आसवांनी ओली झालेली भुई नखांनी ओरखडून पाहत असतो. थोडी माती हाती आल्यावर मी तिला तळहातावर पसरवतो. त्यावेळी मला त्यात मामा दिसतो. 'मी तसं काहीचं केलं नव्हतं रे', असं ओरडून सांगणारा जीर्ण झालेला मामाचा देह मला त्या मातीत दिसत असतो. मग प्रश्नांच्या मुंग्या माझा मेंदू कुरतडू लागतात. अंगावरची कातडी शुष्क झाल्यावर मामाची वासना जिवंत झाली असावी का? त्याच क्षणी त्यानं खरचं सुनेचा हात धरला असावा का? की तिनंच कांगावा करून तिच्या नवऱ्याला भरीस घातलं असावं? पण मला पक्की खात्री आहे. मामा निर्दोष असावा. ज्यानं आयुष्यभर साधन-सुचिता जपली, त्याच्या हातून असं होणं शक्यच नाही. ते खोटं होतं म्हणूनच तो खोट्या आरोपांनी व्यथित झाला अन् त्याचाच धक्का बसून तो अर्ध्याअंगानं लुळा झाला नसेल काय? हा कुठल्या नियतीचा अभिशाप असावा? हे सारं वासनाभ्रमाचं चकवाचक्रच नसावं का?

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०






समजूत घालता
ानी दगा दिल्यावर दारूनंच साथ दिल
विनंती स्पष्टपणे अमान्य करतो. तो दररो
रू पितो, दुपारी दारू पितो आणि रात्रीदेख दारूच पि
सततच्या मद्यपानामुळे त्याचा देह दीर्ण झाला आहे.
रस्त्यात, गटारात, मळ्यात, शे कोठेही आणि कधीही
दारूमुळं हरपलेली शुद्ध उ कवटाळीत अस्तावस्त पडलेला
दिसतो. त्याच्या या स्थाशी मी जवळून संबंधित राहिलो.
त्याच्या जीव मी शब्दांचा स्पर्श केला म्हणून आणि
हणूनच दुपारी त्याच्या बेहोश देहावर अग्निफुलां
शी जळत असते. तेव्हा माझ्या पिळवटलेल्या धा
स्मरणचित्रांत तो भोगत असलेल्या अ
माझेही अंग पोळत अ

# ५ अग्निफुलांच्या स्मरणाचा अभिशाप

भरदुपारी जेव्हा पेटलेल्या आभाळातून ओकणाऱ्या अग्निफुलांनी सारा देह जळत असतो तेव्हा आणि तेव्हाच पोळलेल्या मनाच्या पिळवटलेल्या धाग्यांनी विणलेल्या स्मरणचित्रांत 'तो' भोगत असलेल्या अभिशापाचा ठसठसता वेदनादाह माझेही अंग जाळत असतो. खरं म्हणजे त्याचं माझं नातं केवळ पुरुषात्वाच्या समान धाग्याचचं नव्हे, तर तो माझा अगदी जवळचा नातेवाईक ! भाऊच म्हणा हवं तर.

खूप-खूप दिवसांपूर्वीची ही गोष्ट. मी तेव्हा दहावी-बारावीत असेन. वाचण्याची प्रचंड आवड. इतकी की, वार्षिक परीक्षा सुरू असतानाही गाईडमध्ये नारायण धारप यांची 'सैतान ही भय' कांदबरी ठेवून वाचण्याचा मोह मी टाळू शकलो नव्हतो. वाचण्याबरोबरच ट ला ट जोडून कविताही करू लागलो होतो. नाशकात शिकायला अप-डाऊन करता करता प्रवासात भेटलेल्या पत्रकाराच्या ओळखीचा फायदा घेऊन नवकवीच्या कविता म्हणून चार ओळी कुठल्याशा पुरवणीत छापूनही आणल्या होत्या. त्यासोबत माझा फोटोही प्रसिद्ध झाला होता. साहजिकच मित्रांच्या कोंडाळ्यात भाव वाढला होता. कॉलेजातून दुपारी दोन वाजता गावी आलं की, घरासमोरच्या बाभळीच्या झाडाखाली खाटेवर मनसोक्त वाचत बसणं किंवा काहीतरी खरडत बसणं हाच माझा उपद्‌व्याप. सोबतीला रेडिओवर मुंबई आकाशवाणी किंवा विविध भारती असायचीच.

तर अशाच एका भरदुपारी डोक्यावर तिरपी पांढरी टोपी घातलेला हा माझा लांबचा भाऊ बाभळीच्या झाडाखाली विसावला. 'काय मुकुंदराव, काय लिहताय?' असं विचारलं (दत्ता पाटलांच्या कुठल्याशा कादंबरीत लेखक असलेल्या एका नायकाचं कथानक होतं. मुकुंद हे त्या कथानायकाचं नाव. ही कादंबरी वाचल्यापासून हा भाऊ मला मुकुंदराव म्हणत असे.) तर त्यानं असं विचारल्यावर मी हसलो, 'अभ्यास करतोय' म्हटलं. तसा तो म्हणाला, 'मला तुझ्याशी काम आहे. खासगी, काहीसं नाजूक'.

'कोणतं काम !'

'पत्र लिहून पाहिजे'.

'मग तूच लिही की, काही अशिक्षित नाहीस. चांगला बीए पास आहेस'.

'मला प्रेमपत्र लिहायचं', काहीसं लाजत तो म्हणाला. 'तू लेखक आहेस, तुझ्या स्टाईलनं छान पत्र लिहून दे'.

'मी आतापर्यंत अनेकांना प्रेमपत्रं लिहून दिलेली आहेत. हे खरं आहे, पण त्यापैकी बहुतेकांची गलबतं भर समुद्रात गेल्यावर फुटली. एखाद्याचीच प्रीती काहीशी सफल संपूर्ण झाली आहे'.

'ते काहीही असो, मला आताच पत्र लिहून दे'.

त्यानं मला निर्वाणीचं बजावलं. मग मी त्याला त्याची पूर्ण कहाणी विचारली. त्यानंही न संकोचता त्याची कहाणी सर्व बारकाव्यांसह मला सांगून टाकली. कोणत्या तरी प्रेम कवितेच्या ओळींनी सुरुवात करून त्याला पत्रही लिहून दिलं. तो गेला.

त्यानंतर एक महिना उलटला असेल. तो पुन्हा आला. चेहरा हसरा. आल्याबरोबर माझा हात घट्ट पकडून म्हणाला.

'झाली बरं का आपली प्रेमकहाणी सुरू'.

'पत्र वाचलं का तिनं?'

'मग, जाम खूश झाली. तिनं पण मला पत्र दिलं'.

'दाखव ना मला'.

'पळं, कोणाचं खासगी पत्र वाचू नये. लहान मुलांनी' !

'घ्या, म्हंजे मी पत्र लिहून दिलं तेव्हा तुझ्यापेक्षा लहान नव्हतो काय रे'?

- मध्ये बराच वेळ निशब्द गेला. मग तो म्हणाला,

'माझ्या प्रेमावर कथा लिहशील'?

'कधी हवी आहे ते फक्त सांग'.

'आठ-दहा दिवसात दे'.

'पण मला तुझ्या प्रीती कथेची कहाणी तर ऐकवं'.

- मग त्यानं तिच्या प्रथम भेटीपासून तर अगदी एकांतात तिला भरदुपारी तिच्याबरोबर केलेल्या प्रणयचेष्टांसह सारी कथा सांगितली. आठ-दहा दिवसांनी मी त्याला हवी तशी कथा लिहून दिली. कॉलेजात घरी येतानाच रस्त्यावर असलेला तिच्या बापाचा बंगला, तेथे आल्यावरच त्याच्या सायकलची हवा जाणं, हवा भरण्याचा पंप मागण्यासाठी तो दारात उभा राहणं, मग तिचं पाहणं, त्यांचं प्रेमात पडणं इत्यादि वगैरे. अशा सूत्रात मी त्याची कथा लिहून दिली. पिवळी पुस्तकं वाचण्याच्या त्या वयात मी त्यांच्या प्रणयरंग कसा रेखाटला असावा, याची त्याला प्रचंड उत्सुकता होती. तो प्रसंग त्यानं मला 'तसा' रंगवून सांगितलेला नसला तरी आणि तो प्रणय पिवळ्या शब्दांतच मांडणं अशक्य नसलं तरी मी मात्र तो प्रसंग एक-दोन वाक्यातच संपवून टाकला होता. त्याच्या या प्रसंगाबाबत लिहलं होतं,

''... ती दोघं बाहेर आली तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर अपार सुखाच्या खुणा गोंदलेल्या होत्या आणि भरदुपारी अग्निफुलांनी अंथरलेल्या रस्त्यावर गुलाब पाण्याच्या

पान दोन पाहा

# अग्निफुलांच्या स्मरणाचा अभिशाप

अत्तराच्या पायघड्या पसरलेल्या होत्या..''

- मी केलेलं हे वर्णन वाचून तो तर अक्षरश: नाचला होता. माझे डोक्यावरचे केस असे विस्कटून टाकत, 'तू खरचं ग्रेट आहेस', असं म्हणाला होता...

खूप दिवसांचे पूर पुलाखालून वाहून गेले. त्याची प्रीती कथा सफल झालीच नाही. ती मुलगी वेगळ्या जातीची. त्यामुळं त्या काळात असा आंतरजातीय विवाह सोपा नव्हता. त्या मुलीच्या बापानं त्याच्या जातीच्या मुलाबरोबर तिचं लग्न ठरवलं. त्या अगोदरपासूनच तिनं माझ्या या भावाला भेटणं टाळलं होतं. एक दिवशी हा मळ्यात उसाला पाणी भरण्यासाठी गेला असताना पोस्टमननं खास मळ्यात जाऊन त्याला तिच्या लग्नाची पत्रिका दिली. ती वाचतानाच त्याला प्रचंड नैराश्याचा झटका आला. वेड्यासारखा ओरडत तो धावत सुटला. शेतात ज्या ठिकाणी त्यांचा प्रणय रंगला होता, तेथे तो गेला. पत्रिकेचे तुकडे करून तिथल्या मातीत ते मिसळून टाकले. ती माती तोंडात भ्रमिष्टासारखा कोंबू लागला. कितीतरी वेळ तो असाच तोल गेलेल्या माणसासारखा वागत राहिला...

त्या दिवसापासून त्याचं भावविश्व बदललं. तो एकांतात स्वत:शीच बोलत राही. हवेत उभ्या असलेल्या त्याच्या प्रियेच्या भासमयी अस्तित्वाबरोबर वाद घालीत राही. त्याची ही अवस्था पाहून सारेच हळहळले. शेवटी शेजारच्या गावातल्या एका गरिबा घरच्या लेकीबरोबर त्याचंही लग्न लावून देण्यात आलं. मात्र तो संसारात रमला नाही. अर्थात निसर्गधर्माप्रमाणं त्याचा संसार तीन माणसांनी वाढला, पण तो केवळ निसर्ग नियमाप्रमाणेच. पुढे त्याची मानसिक भ्रमिष्टावस्था एका परीनं संपली, पण त्यानं रस्ता धरला तो दारूचा. मद्याच्या प्रचंड आहारी गेल्यानंतर एका वेगळ्याच संशयपिशाच्याने त्याला पछाडले. मग तो सकाळी चहाऐवजी दारू पिऊन जेव्हा गावातल्या चौकाचौकात उभा राहून आपल्या संसाराचा पंचनामा करू लागला तेव्हा सारं गाव अवाक् झालं.

मी गावी गेलो की, त्याला आवर्जून भेटण्याचा प्रयत्न करतो. बेहोश झालेल्या त्याच्या डोळ्यात मला त्याच्या विफल प्रीतीची व्यथा जळताना दिसते. मला पाहिलं की, तो हसतो. पूर्वीसारखाच 'काय मुकुंदराव, माझ्यावर लिहा की आणखी एखादी कथा' असं दारूमुळं जडावलेल्या जिभेनं सांगतो. मी मात्र त्याला दारू पिऊ नको असं सांगतो, पण तो म्हणतो,

'हम कहा शराब पी रहे है?

कंबख्त, ये शराब हमे पी रही है'!

मी त्याची वारंवार समजूत घालीत राहतो, तो मात्र पुन्हा पुन्हा माणसांनी दगा दिल्यावर दारूनंच साथ दिली असं म्हणत माझी विनंती स्पष्टपणे अमान्य करतो. तो दररोज सकाळी दारू पितो, दुपारी दारू पितो आणि रात्रीदेखील दारूच पितो. सततच्या मद्यपानामुळे त्याचा देह विदीर्ण झाला आहे. रस्त्यात, गटारात, मळ्यात, शेतात तो कोठेही आणि कधीही दारूमुळं हरपलेली शुद्ध उराशी कवटाळीत अस्तावस्त पडलेला दिसतो. त्याच्या या सर्वावस्थाशी मी जवळून संबंधित राहिलो. त्याच्या जीवनकथेला मी शब्दांचा स्पर्श केला म्हणून आणि म्हणूनच भरदुपारी त्याच्या बेहोश देहावर अग्निफुलांची गोंदणनक्षी जळत असते. तेव्हा माझ्या पिळवटलेल्या धाग्यांनी विणलेल्या स्मरणचित्रांत तो भोगत असलेल्या अभिशापाचा ठसठसता वेदनादाह माझेही अंग पोळत असतो...

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०



# मोर चोरतो माझा डोळा

तिच्या आठवणीचं मोरपीस आपल्या
राहतं. आपण कोठेही गेलो तरी हा पिंगा काही सुट
नसतो. पुढं या मोरपिसाला स्वप्नांची पिल्लं होतात
येतो. पुस्तकातल्या मोरपिसाचा मोर झाले असतो. नाचता
नाचता मोराची पिसं भिजलेल्या उंचच उंच उडून
जातात. दिसेनाशी होतात पावसामुळं साऱ्या रानाचा चिखल
होतो. त्यात मोर जातो. मागं उरतात केवळ चिखलात
उमटलेल्या नाचऱ्या मोराच्या पावल्यांच्या खुणा. असे अनेक
पा तात-जातात. नदीला कितीदा पूर येतो-जातो.
पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं... आपल्या
पुस्तकातलं मोरपीस फिक्कट-फिक्कट होत गेलेलं असतं...

# ६ मोर चोरतो माझा डोळा !

किती दिवस झाले असतील? असतील १०-१२ वर्षं. आपण तेव्हा १८-२० वर्षांचे असू. आता त्यात काय एव्हढं? १८-२० वर्षांचे तर सारेच होतात. पण आपली ही २२ वर्षांपूर्वीची साठवण म्हणजे काळजाच्या कोपऱ्यातल्या कुपीत बंद करून ठेवावी अशी, सुगंधित मोगऱ्यानं वार केल्यावर झालेली जखमच ! आज २२ वर्षांनंतर ती का बरं वाहू लागली? कुठंतरी दुकानात पाहिलेलं ते मोरपीस, त्यावरचा खुणावणारा डोळा, म्हणून तिची आठवण अशी गोळा झाली असावी का? मोरपीस ! सप्तरंगी, नाजूक. ते हळुवारपणे आपल्या अंगावर फिरतं. त्यामुळं आपण रोमांचित होऊन जातो. आतासुद्धा आपण असचं त्या मोरपिसाच्या स्पर्शानं कसे शहारून, थरारून गेलो आहोत. जणू काही ती हळुवार पावलानं आली असावी अन् तिची नाजूक लांबसडक बोटे आपल्या केसांवरून फिरवत असावी. भासच पण, किती खरा ! अगदी ती समोरच उभी ठाकली असावी असा. 'ती' म्हणजे २२ वर्षांपूर्वी भेटलेली, मनात दाटलेली अन् काळजात साठलेली...

***

जून किंवा जुलै महिना असावा, वहिनीच्या माहेरी तिच्या आग्रहाखातर आपण गेलेलो असतो. हा आग्रह आपली प्रकृती लवकर सुधारावी यासाठी असतो. म्हणजे झालेले असतं काय? आपण खूप आजारी वगैरे पडतो. आपणास डॉक्टर चांगलं दोन आठवडे ॲडमिट करून ठेवतात, एक्स रे, रक्त, थुंकी वगैरे तपासण्या करतात. मोठ्या भावाला गंभीरपणे काही बाही सांगतात. नंतर त्यांनी १०० इंजेक्शनचा कोर्स करायला सांगितलेली असतो. दररोज एक इंजेक्शन घेऊन घेऊन आपल्या पार्श्वभागाची अगदीच चाळण झालेली असते. थोडं जरी बसायचं म्हटलं तरी बुड टेकवताना जे हाल होतात, त्याला उपमाच नसते. म्हणून मग बहुतांश वेळ उभं राहणं किंवा सरळ एका कुशीवर पडून राहणं हेच पर्याय आपल्यासमोर असतात. अशा स्थितीतही वहिनीच्या माहेरी मोकळी हवा म्हणून आपण तेथे गेलेलो असतो. तिथेच ती भेटते. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये पुण्याहून खास ती छोट्याश्या खेडेगावात मुद्दामहून आलेली. तिला पाहताच आपण कसं माहेरून गेलेलो असतो. ती पाहते तेव्हा लखकन वीज अशी चमकून जाते, कारण तिचे डोळे ! काय उपमा द्यावी या डोळ्यांना? असं क्षणभर वाटते. हरणांचे डोळे असेच असतात काय? की मोरानं चोरलेले डोळे, तो पिसांवर मिरवतो तेव्हा ते असेच दिसतात काय? देवाशपथ ! त्या डोळ्यांनीच प्रथमक्षणी आपण घायाळ वैगरे झालेलो असतो. ती हसते, मोत्यांची माळ ओठांच्या कडांवरून ओघळावी अशी ! ती बोलते, एखाद्या कुशल संगीतकाराने जलतरंगावर हळुवारपणे नाद करावा तसे...

***

येथे येऊन दोन/तीन दिवस झालेले असतात. या खेडेगावात डॉक्टर नसतो. मग, आपण वहिनीच्या भावाबरोबर दररोज संध्याकाळी तेथून जवळच असलेल्या थोड्या मोठ्या गावात सायकलवर बसून जातो. तिकडचे रस्ते म्हणजे तेथून लोक येतात-जातात म्हणून त्याला रस्ता म्हणावा असे असतात. खड्डे, मोठे दगड टाळून वहिनीचा भाऊ सायकल दामटत असतो अन् आपण मूळ भित्र्या स्वभावाची लाज राखत, दुखणारं बुड त्यातला त्यात कॅरेजवर कसं-बसं टिकवत बसलेले असतो. मग तो खेड्यातला डॉक्टर त्याच्या जड हातानं इंजेक्शन टोचत राहतो. असेच दिवस जात राहतात. ती आता वहिनीच्या माहेरीच ४/५ दिवसांसाठी आलेली असते. तिच्या सोबत बोलताना, हसताना दिवस कसे जातात हेच आपणास कळालेलं नसतं. हळूहळू जेवताना आपण तिच्याकडं डोळ्यांच्या एका कोपऱ्यातून पाहिल्यावर ती कशी दिसते याचं अवलोकन करीत असतो अन् आपल्या नकळत ती आपल्या ताटात भाजी-पोळी जास्त टाकते. हे आपल्या लक्षात येत नाही. जेव्हा लक्षात येतं तेव्हा आपलं पोट भरलेलं असतं अन् ताटात बरेच काही शिल्लक असतं. त्यात आपण हात कसा धुणार? ती दुसरं ताट हात धुण्यासाठी देते अन् आपल्या उष्ट्या ताटातच जेवण करते. हे पाहून आपल्याला खूप खूप बरं वगैरं वाटलेलं असतं. (खरं ना?) घराशेजारच्या विहिरीवरील ओहळावर बसल्यावर आपण डॉक्टरकडून येताना वहिनीच्या भावाच्या नकळत आणलेलं चॉकलेट तिच्या हातावर चोरून देतो, तेव्हा ती वेगळ्याच अनुभूतीनं थरारते... तीसुद्धा कोणी बघत नाही हे बघून दातानं चॉकलेटचे दोन तुकडे करून तिच्या तोंडाला तुकडा बाहेर काढून हळूच आपण आ केलेल्या तोंडात टाकते, तेव्हा आपणाला जो आनंद होतो तो शब्दांच्या चिमटीत कसा पकडणार? मग, असेच दिवस जात राहतात...

सुट्टीचे दिवस कापरासारखे उडून गेलेले असतात. ती

पान दोन पाहा

# मोर चोरतो माझा डोळा !

पुन्हा पुण्यास निघते. आपण कालच जनरल स्टोअर्समधून आणलेली अंगठी तिच्या हातात गुंफलेली असते. बस स्टॅण्डकडं जाताना ती हळूच आपल्या पर्समधून छानसं मोरपीस काढते. हळुवारपणे आपल्या हातावर ठेवते. किंचित हसते. म्हणत, 'हे मोरपीस जपून ठेव. हे खरं आपलं स्वप्नचं आहे. ते हरवू नकोस. माझी आठवण आली की, हे मोरपीस बघ. मी प्रत्यक्ष भेटलीय असं समज...' ती जाते आणि मग तिच्या आठवणीचं मोरपीस आपल्या मनाभोवती पिंगा घालत राहतं. आपण कोठेही गेलो तरी हा पिंगा काही सुटलेला नसतो. पुढं या मोरपिसाला स्वप्नांची पिल्लं होतात. मग पाऊस येतो. पुस्तकातल्या मोरपिसाचा मोर झालेला असतो. नाचता नाचता मोराची पिसं भिजलेल्या हवेत उंचच उंच उडून जातात. दिसेनाशी होतात. पावसामुळं साऱ्या रानाचा चिखल होतो. त्यात मोर बुडून जातो. मागं उरतात केवळ चिखलात उमटलेल्या नाचऱ्या मोराच्या पावल्यांच्या खुणा. असे अनेक पाऊस येतात-जातात. नदीला कितीदा पूर येतो-जातो. पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं... आपल्या पुस्तकातलं मोरपीस फिक्कट-फिक्कट होत गेलेलं असतं...

✻✻✻

आपण दारात उभे असताना पोस्टमन आलेला असतो. आपल्या हाती पत्रिका ठेवतो. आपण ती उघडतो. प्रचंड, प्रचंड धक्का बसतो. ती तिच्याच लग्नाची पत्रिका असते. कोण्या मोरे आडनावाच्या माणसाशी तिचं लग्न होणार असतं. पत्रिकेवर तिच्या अक्षरात आपल्यासाठी खास लिहिलेलं असतं, 'लग्नाला यायचं, प्रत्येकाच्याच आयुष्यात मोरपीसं फुलत नसतात. हा प्राक्तनाचा लेख असतो. तो आपण फक्त भोगायचा म्हणून पुस्तकातलं मोरपीस रानात फेकून दे, लग्नाला जरून ये.' तुझी (?)

✻✻✻

तिच्या लग्नाचा आज पहिला वाढदिवस असतो का? बहुतेक असावा कारण सकाळपासूनच पाऊस पडतोय, कुणाची तरी पैंजण मोर होऊन नाचताहेत, कोणाची? तिचीच तर नव्हे? आपण डोळे मिटतो, तेव्हा काळजावर कोणी तरी मोरपिसानं कोरतंय का प्राक्तन लेख? कपाळावरचं प्रारब्ध काळजावर लेऊन चालत राहायचं म्हणून आपण उठलेलो असतो. गावाकडून वहिनी आलेली असते. सांगते, 'तुम्हाला काही कळलं का'?

'कशाबद्दल'

'तिने फारकत घेतली...!'

- अरेरे, वाईट झालं, ती म्हणाली होती तेच खरं, प्रत्येकाच्याच आयुष्यात काही मोरपीस फुलत नाहीत; पण, तिचा हा डाव असा अर्ध्यावरच का मोडावा? कोणत्या कपाळ-गोंदणाचे ऋण ती फेडत असावी? छे, हे असं व्हायला नको होतं. आपण मनाशी चुटपुटतो. पुस्तकातलं मोरपीस आपल्याला पुन्हा खुणाऊ लागलेले असतं...

✻✻✻

आपण तिची वाट पाहत किती वेळ उभे असतो. किती दिवस? की वर्षं? पहिला डाव मोडल्यावर ती दुसरा डाव आपल्याबरोबर मांडील अशी आशा आपल्याला असते; पण ते तसं होत नाही. ती दुसऱ्या कोणाबरोबर तरी पुन्हा संसाराचा डाव मांडते आणि आपण तिच्या प्रतीक्षेत उभे राहतो. दाराच्या चौकटीवर माथा ठेवून, काळजाला मोरपीस खोऊन...


- आता आपणच मोर झालेलो असतो. पिसारा उखडून गेल्यावर विद्रूप झालेले पाय उराशी घेऊन नदीकाठच्या त्या निवडुंगाच्या रानात पडलेलो असतो. आपल्या डोळ्यांच्या खाचा झालेल्या असतात. बुबुळ नसलेल्या खाचा. त्या खांचात कधी काळी मोरपिसाचे डोळे अडकलेले असतात. पण, आता तेथे असतो फक्त अंधारडोह. त्या अंधार होडातून चित्रविचित्र स्वप्नचित्र दिसत असतात. आपले डोळे कुठे केले? कोणी चोरून नेले? त्या मोरानं तर नव्हे? आपण प्रश्न सोडवित बसतो. आयुष्यभराचा एकाकीपणा अंगाभोवती लपेटून घेत असतो. मधूनच त्या काळ्याशार डोहाच्या कॅनव्हॉसवर तिचा चेहरा दिसत असतो. आपण तिचा हा चेहरा ओंजळीत धरण्याचा प्रयत्न करीत असतो. पण, स्वप्नातला आलेला धुक्याचा पदरच तो, हाती कसा लागणार? मग आपल्या तळव्यावर दोन ओळी उमटतात -

मोर चोरतो माझा डोळा
पिसांवर मिरवतो,
पुस्तकातली मोरपिसं
रानात कशी हरवतात?...

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०

# नन्याच्या चेहऱ्यावरले फ़ुईचे साईचे हात



फुई बसायची

म्हणत असतानाही डोळ्यातले

सांडले. मी खाली बसलो. थोडी माती

कपाळाला लावली. कागदात मुंडाळ माती खिशात टेवली.

माझ्या शहरातल्या घरी पर ती पुडी बाहेर काढली.

पाहिली. ती माझ्या चेह अशी अलवार फिरवली. कोठून

एक वाऱ्याची मंद आली. 'माझ्या नन्या, कसा आहेस

रे बाबा?' कोणी कानाशी बोलल्यासारखं वाटलं. अवघा

देह गेला. ती माती पुन्हा माथ्याशी टेकवली. ते जणू

माझ्या चेहऱ्यावरले फिरणारे फुईचे सायीचे हात असावेत असे

वाटून मी ती माती देव्हाऱ्यात टेवून दिली...

# ७ नन्न्याच्या चेहऱ्यावरले फुईचे साईचे हात

विरून गेलेल्या दिसांच्या स्मरणाचे व्रण काळजावर ओरखडे उठवित असताना; मिटलेल्या, विझू लागलेल्या डोळ्यांच्या खाचांमध्ये पसरलेल्या काजळगर्भात काही चित्रे उमटतात. त्यात शैशवातील बालसुलभ आठवणी, कुडाचं घर, दारासमोरची शेवरी, विहिरीवरले पाची आंबे आणि त्याच्या जवळून गेलेल्या पायवाटेचे शेवटचं टोक असणारा मळा, जो माझ्या फुईचा असतो. या साऱ्यांची स्मरणचित्रं ओळीनं भिंतीवर टांगावीत तशी दिसत असतात...

माझी फुई, म्हणजे वडिलांची मोठी बहीण. दोघांच्या चेहऱ्यात प्रचंड साम्य. फुई म्हणजे साक्षात मायेचं माहेरच जणू. भावंडांमध्ये मी शेंडेफळ म्हणून तिचा विशेष लाडका वगैरे असावा कारण, ज्या ज्या वेळी तिची माझी भेट होत असे त्या त्या वेळी ती मला जवळ घेऊन तिचे साईचे हात माझ्या चेहऱ्यावरून अलवार फिरवी अन् ते दोन्ही हात आपल्या ओठांशी नेत पापी घेई. कधी कधी ते हात माझ्या माथ्यावरून फिरवून स्वत:च्या कानशिलाजवळ नेऊन बोटं मोडून दृष्टदेखील काढीत असे. मला बघितलं की, 'आला बाई माझा 'नन्न्या', असं कौतुकानं म्हणत असे. तिनं ठेवलेलं हे नाव मला चांगलं दहावीला जाईपर्यंत चिकटलं होतं...

मला जेव्हापासून आठवतं तेव्हापासून मी पाहिलेली फुई तिच्या शेवटपर्यंत तशीच होती. आमच्या घरापासून वाळ्या तात्याचं घर ओलांडलं की, फुईचा बंगला लागायचा. हो, बंगलाच होता तो एक प्रकारचा ! चांगलं पाच-सहा खणी घर. तिन्ही बाजूनं पडव्या, उजव्या बाजूला पाठीमागं विहिरी, ओहळ, त्याच्यासमोर डेरेदार झाड. घरासमोर तुळशी वृंदावन आणि त्या पुढच्या वावरात नेहमी हिरवंगार असणारं एखादं पीक. घरात चोपाळा टांगलेला, भिंतीवर देवदेवतांचे फोटो आणि ती कधी काळी चारीधाम करून आली होती, त्याच्या आठवणी फ्रेम करून टांगलेल्या. या खोलीच्या शेजारीच सामानाचं छोटं घर... हे सारं आमच्या कुडाच्या घरापेक्षा निश्चितच वेगळं होतं.

फुई साधारणत: नेहमी घराशेजारच्या झाडाखाली बाजेवर बसलेली असायची. तिथं नसेल तर सामानाच्या खोलीत सुनांना साखर, चहा किंवा स्वयंपाकासाठी लागणारं साहित्य काढून देताना ! ती झाडाखाली असेल तर तिच्या तीन मुलांचा विस्तार तिच्याभोवती बागडत असायचा. त्यातलं लहान पोर मांडीवर असायचं अन् ती आपल्या हातानं त्याला काही ना काही भरवित असायची. आमचे मामा तालुकाभरात प्रख्यात असल्यामुळं राबताही खूप असायचा. मामांना भेटायला आलेली बाया-माणसं फुईला आवर्जून भेटायची. मला मामांची तशी भीती वाटत असल्यामुळं मी त्यांच्याशी फारसा कधी बोलत नसायचो.

आपला भाऊ गरीब आहे, याची जाणीव फुईला होती. तिच्या घरात खंडीनं गायी-म्हशी होत्या. दूधदुभतं चांगलं होतं. त्यामुळं तिच्याकडं गेलं की, साखर घातलेलं चांगलं प्यालाभर दूध हमखास मिळायचं. माझे वडील दर गुरुवारी शादावलबाबांचा उपवास करीत असत. त्या दिवशी खिचडीबरोबर त्यांना दही लागायचचं; पण आताशा आमच्याकडची शेवरी गाय आटलेली असल्यामुळं दूधही विकत घ्यावं लागे. अशा वेळी दही येणार कोठून? वरल्यांगच्या माडीतल्या सोन्याकाकूकडून कधी कधी वाटीभर दही येत असे खरं; पण दर गुरुवारी फुईच्या मळ्यात गेलं की, ती चांगला तांब्याभर दही हाती देऊन घराच्या मागच्या पडवीच्या दारातून गुपचूप घरी पिटाळत असे. एखाद्या वेळी पायली-दीड पायली गहू, शेर-अच्छेर हरबरे, बाजरी असं काही देत असे. अर्थात तेदेखील घरातील कोणाला न कळत. विशेषत: मामांच्या लक्षात येणार नाही अशा रितीनं.

दिवाळीत आमच्या घरी येणारी फुई हा आठवणीचा स्वतंत्र पदर आहे. भाऊबीजेच्या दिवशी मोठी बहीण गावात मारुतीच्या देवळातून आल्यानंतर आम्हा भावंडांना एका ओळीत बसवून ओवाळीत असे. साधारणत: त्याच वेळी फुई तिच्या मळ्यातून येई. भिंतीशी टेकत थोडा वेळ शांत बसून राही. ती आली की, आम्ही सारे तिच्याभोवती गोळा होऊन बसत असू. मग मला जरा जवळ घेऊन ती नेहमीप्रमाणं मायेचा वर्षाव करीत असे. मग दोऱ्यांची सुंदर नक्षी असलेल्या कापडी पिशवीतून तिनं आणलेला दिवाळीचा फराळ, जो बहुतेक वेळा वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेला असे तो काढी. त्यात चिवडा, करंजी, थोडीशी शेव असं काहीतरी असे. फराळ स्वयंपाक घरात नेऊन ठेवला की, पुन्हा आम्हा साऱ्या भावंडांची ओळ बसत असे. फुई ओवाळणीच्या ताटात नाकातली सोन्याची नथ काढून ठेवी. मग प्रत्येकाच्या कपाळावर सायीचा ठिपका ठेवून गंध, तांदूळ त्यावर चिकटवी. 'इडापिडा जावो, बळीचं राज्य येवो', असं काही पुटपुटत सोबतच्या करदोऱ्यातील एकेक काढून आमच्या

पान दोन पाहा

हाती ठेवत असे. ओवाळून झाल्यावर आप्पा (मोठाभाऊ) तिला लुगडं देई. ते महाग वगैरे असाचयं. फुईला ते लुगडं खूप आवडायचं (पण दोन-तीन महिन्यांनी ते फुईला आवडलेलं नव्हतं. आणखी भारी हवं होतं. असं तिच्या घरातलं कोणीतरी माझ्या आईला सांगायचं, मग त्यावर आमच्या घरात एक 'चर्चासत्र' व्हायचं.)

फुई गेली, तेव्हा आमच्या घरी मोठ्या पुतणीच्या लग्नाचा जागर सुरू होता. आमच्या घरातलं मुलीचं म्हणून पहिलंच कार्य. त्यासाठी खंडोबाचं जागरण करून लंगर तोडायचा होता. वाघ्या मंडळी रात्रभर खंडोबाची गाणी म्हणत होती. पूर्वेला दिशा थोडी उजाडली. बापू थंडीत कुडकुडत गंगेवर गेला. आंघोळ करून परतला. खंडोबाची आरती म्हटली गेली अन् एका टोकाला भुईत खुंट्याभोवती जोडलेला लंगर (लोखंडी साखळी) बापूनं ओढला. तो तुटला, पण त्यावेळी तो लंगर वेगानं मागं जाऊन बापूच्या पाठीवर आदळला. बराच मार लागला. वाघ्या म्हणाला, 'काही तरी अशुभ घडणार'. मग चहापाणी घेत असतानाच फुईच्या मळ्यात रडण्याचा ओरडा ऐकू आला. मळ्यातून कोणीतरी धावत आमच्या घरी आलं मग वाऱ्यानेच निरोप दिला. फुई गेल्याचा...

सारं घर क्षणार्धात सुन्न झालं. सगळेच मळ्याकडे धावले. तेथे मधल्या घरात सतरंजीवर फुई झोपलेली. यापुढे ती कधीच उठणार नव्हती. जवळ घेऊन 'माझ्या नन्न्या' म्हणत तोंडावरून हात फिरवणार नव्हती, 'माझा भाऊ गरीब आहे. देते त्याला थोडंसं तरी बिघडलं कुठं? असं म्हणत तिच्या पोरांशी भांडणार नव्हती. गुरुवारी भावाला आवडतं म्हणून ताब्यांभर दही पदराआड झाकून देणार नव्हती. ती आता पुन्हा कधीच उठणार नव्हती. माझ्या आयुष्यात जवळच्या नातेवाईकाचा मी पाहिलेला तो पहिलाच मृत्यू... संसार सोडताना तिच्या चेहऱ्यावर अपूर्व समाधानाची साय होती. त्यामुळेच तिचा तो शेवटचा मी पहिलेला चेहरा माझ्या काळजावर कायमचा कोरला गेला आहे.

फुई गेली अन् आमच्या दोन्ही घरातील अंतर नाही म्हटलं तरी वाढलं. मुळात मला पितृकुळातील जवळचं नातेवाईक नाही. मोठे चुलते माझ्या जन्माअगोदर वारलेले. एक चुलत बहीण आणि ही फुई हेच आमचं नातेवाईक म्हणून सांगायचं, हक्काचं ठिकाण.

काल परवा गावी गेलो तेव्हा का कोण जाणे; पण मन ओढाळ झालं. तयारी नसतानाही पाय आपोआप फुईच्या मळ्याकडं वळले. मी काळजावर कोरलेलं ते घर आता घर वाटत नाही असं झालं आहे. (आमचं तरी घर कुठं पहिल्यासारखं राहिलंय.) मी गेलो तेव्हा एक झावरं कुत्र भुंकलं. विहीर तशीच होती. तिच्या शेजारचा ओहळ मात्र पूर्णपणे फुटून गेलेला. फुईची कोणती तरी नातसून बाहेर आली. तिच्या डोळ्यात 'कोण पाव्हणा आलाय' असा अपरिचित भाव. मग आतेभाऊ बाहेर आला. 'ये, ये, किती दिवसांनी आलास? बराय आहेस ना?' अशी सारी चौकशी केली. मी घरात गेलो. भिंतीवर देवदेवतांचे फोटोही तसेच; पण सारं धुरकटलेलं, फिक्कट. सुनेनं चहा आणला. कान तुटलेल्या कपातला तो काळसर चहा कसा बसा प्यालो.

इकडच्या तिकडच्या गप्पा मारून मी परत निघालो. जेथे फुई बसायची त्या झाडाखाली क्षणभर थबकलो. नको, नको म्हणत असतानाही डोळ्यातले दोन आसवे त्या भुईवर सांडले. मी खाली बसलो. थोडी माती तळव्यावर घेतली. कपाळाला लावली. कागदात गुंडाळून ती माती खिशात ठेवली. माझ्या शहरातल्या घरी परतल्यावर ती पुडी बाहेर काढली. पाहिली. ती माझ्या चेहऱ्यावर अशी अलवार फिरवली. कोठून एक वाऱ्याची मंद झुळूक आली. 'माझ्या नन्न्या, कसा आहेस रे बाबा?' असं कोणी कानाशी बोलल्यासारखं वाटलं. अवघा देह थरारून गेला. ती माती पुन्हा माथ्याशी टेकवली. ते जणू माझ्या चेहऱ्यावरले फिरणारे फुईचे सायीचे हात असावेत असे वाटून मी ती माती देव्हाऱ्यात ठेवून दिली...

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**किरण लोखंडे**

एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८

**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०



# कोणत्या प्राक्तनाचा लेख?

तंबाखू हीच त्याची खरी सखी असावी, म्हणूनच तिच्या प्राप्तीसाठी तो नेहमीच वाट्टेल ते करायला तयार [illegible]. कधी कोणाच्या बैलांना घास कापून दे, गा[illegible] पाज, दळण आणून दे अशी कामं तो तत्परते[illegible]रीत असे. मात्र हे फक्त तो शहाणा असला की [illegible]. पुढे पुढे हे त्याचं तात्कालिक शहाणपणं का[illegible] लुप्त होऊ लागले. मग तो एखाद्या झाडाखाली [illegible]त फक्त बसून राहू लागला. कोणी हाक मारली त[illegible]त्याकडे दुर्लक्ष करू लागला. पोराटोरांनी चिडवलं [illegible]च्यावर दगड भिरकावू लागला. संताप आला तर [illegible]पाट करू लागला. पण तोंडातून कधी अर्वाच्य शिवी येऊ दिली नाही.

# ८ कोणत्या प्राक्तनाचा लेख?

तो जन्माला कशाला आला असावा? कोणत्या प्राक्तनाचा लेख फेडायला तो इथं आला असावा? कोणत्या क्षणी त्याच्या घामाजलेल्या बापानं त्याच्या पिचलेल्या आईला एकांतात खेचलं असावं? ३० वर्षांच्या आयुष्यात त्यानं केलं केलं तरी काय?

काही नाही,

फक्त जगत राहिला, निरर्थक.

फक्त वाढत राहिला, शेतात बुजगावनं उभं करताना पोत्यात तुटेपर्यंत भुसा भरावा तसा, फुगत राहिला.

जगत राहिला...

त्याचं नाव गुलाब, अर्थात हे नाव सोडून दुसरं कोणतंही नाव ठेवलं असतं तरी फारसा फरक पडला नसता. हा आता गुलाब म्हटल्यानंतर आपल्यासमोर एखादा नाजूक, सुस्वरूप असा चेहरा उभा राहणं शक्य असलं तरी प्रत्यक्षात हा गुलाब नावाच्या अगदीच विरोधाभासाचा नमुना होता !

किडकिडा, थोडा उंचसा. चेहऱ्यावर एखाद्या पाथरवटानं दगडावर टोचे मारावेत, अशा देवीच्या व्रणांच्या खुणा. तो बोलायला लागला की, या खुणा, तांब्या-पितळ्याच्या भांड्यांवर ठोके असावेत तशा दिसायच्या. तोंडात कोणी तरी दिलेली वा कोणाकडून मागून घेतलेली तंबाखू अन् सडलेल्या टोमाट्यातून बियांचे ओंगळवाणे ओघळ ओघळावेत तसे ओठांच्या फटीतून लाळ सतत टपकत राहणारी...

त्याचं आम्हाला पहिलं दर्शन घडलं ते आम्ही पहिली-दुसरीत असताना. आमच्या त्या छोट्याशा गावात मारुतीच्या ओसरीत भरणाऱ्या शाळेत गुलाब आला तेव्हा तो अर्थातच आमच्याएवढा नव्हता, मोठाच होता. तो आला तोच मुळी येडागबाळा सोंग घेऊनच. त्या दिवशी मास्तरांनी त्याला गाणं म्हणायला सांगितलं. गुलाबचे आई-वडील आमच्याच गावचे मूळ रहिवासी असले, तरी मुंबईत राहणारे. कसल्याशा आजारात त्याचे वडील गेले मग आई त्याच्या लहान बहिणीसह आपल्या गावी परतली. त्यामुळेच बहुतेक गुलाबनं गाणं म्हटलं ते, 'मुंबई से आया मेरा दोस्त, दोस्त को सलाम करो' हे असं...

गाणं म्हणतानाचा त्याचा तो बावळट चेहरा अखेरपर्यंत तसाच राहिला. त्याचं नाव गुलाब असलं तरी त्याचं कधी गुलाबराव झालं नाही. उलट गुलब्या हेच नाव त्याला मरेपर्यंत चिकटलं. मरेपर्यंत तो असाच ओंगाळवाणा जगत राहिला लोकांनी केलेली कुचेष्टा, चुलत्यांनी मारलेल्या थपडा, चुलत भावजयींचे टोमणे अन् बायकोचा अल्पकाळातला तिरस्कार झेलत...

बायको ! अगदी शोधून जोडा लावावा तशी ही जोडी नातेवाईकांनी जमवली. कोळशाच्या खाणीतून दिवसभर काम करून नुकतीच बाहेर आल्यासारखा काळा ठिक्कर रंग, नाकाच्या वांग्यावर म्हशीनं पाय दिल्यामुळं तिथं केवळ श्वास घेण्यासाठी असावेत म्हणून दोन छिद्रे अन् तिलाही तंबाखू खाण्याची सवय असल्यामुळं पिवळे पडलेले दात. अशा ध्यानाची नवरी अन् वेडगळ नवरा. मग गुलाबचं लग्न साऱ्या गावाला फुकटची करमणूक न ठरती तर नवलच.

त्याचं लग्न झालं म्हणजे भातुकलीचा खेळ तरी चांगला असावा असं. लग्नानंतर पहिल्या आठवड्यातच गुलाबमधला शहाणा पुरुष जागा झाला. त्यानं भरदुपारी बायकोला उसाच्या फडात ओढीत नेलं अन् तिच्या अंगाला जिथं जागा असेल तिथं ओरबडत सुख (!) लुटलं. त्याच्या अघोरीपणामुळं ठणाण बोंबा मारीत त्याची बायको अर्ध्या-उघड्या अंगानं बाहेर पळाली ती थेट माहेरी जाऊनच थांबली. त्यानंतर ती पुन्हा आमच्या गावात कधीही दिसली नाही...

त्याला शहाणं करण्यासाठी म्हणून लग्न करून दिलं होतं खरं; पण बायको पळून गेल्यावर तो आणखीच वेडा झाला. घराशेजारच्या बांधावरून मळ्यात जाणाऱ्या बायांमध्ये त्याला त्याची बायको दिसू लागली. बायकोचा विचार मनात आला की, त्या दुपारचे सुख त्याला पुन्हा हवंहवंसं वाटू लागलं. अन् मग तो या आयाबायांना धरण्यासाठी धावू लागला. असा प्रकार वारंवार घडल्यावर मात्र लोकांनी गुलाबला एखाद्या आडदांड बैलाला चाबकानं फोडावं तसं फोडलं. त्याच्या आईनं आकांत मांडून पदर पसरला, तेव्हा कुठं गर्दीच्या दगडाला पाझर फुटला. मग रक्तबंबाळ झालेल्या गुलाबला पाठीशी घेऊन त्याच्या आईनं घर गाठलं. त्याचं अंग पुसून आंबेहळदीचा लेप लावला. रात्रभर त्याच्या उशाशी जागत बसली.

या प्रकारानंतर मात्र त्याची आई शहाणी झाली. घराबाहेर पडताना त्याला घरात कोंडून जाऊ लागली. खिडकी मात्र तेवढी उघडी ठेवायची. या उघड्या खिडकीसमोर उभा राहून गुलाब जाणाऱ्या-येणाऱ्या बायांना शिव्याशाप देऊ लागला. पुढे पुढे अंगावरचे कपडे काढून घरात तसाच नंगा वावरू लागला. हे सारं पाहून त्याच्या घराजवळून जाणाऱ्या आया-बायांची वाट कायमची बंद झाली...

त्याचं हे वेड कमी व्हावं म्हणून त्याच्या आईनं काही कमी प्रयत्न केले नाहीत. अगदी माहिती असतील तेवढे पीर, भगत, बाबा साऱ्यांच्या पायावर त्याला घातलं, पण उपयोग झाला

पान दोन पाहा

# कोणत्या प्राक्तनाचा लेख?

नाही. उलट दिवसेंदिवस त्याचं वेड मुरत गेलं. कधीकधी मात्र त्याला शहाण्यासारखं वागायचादेखील झटका यायचा. या काळात तो एकसारखं हसत आणि मान इकडून तिकडं एखाद्या स्प्रिंगच्या टोकाला डोकं चिटकवून हेलकावे खात राहावे अशी हलवित चालत राहायचा. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांपुढं हात पसरवून तोंडातली लाळ डाव्या हाताच्या बाहीला पुसत 'तंबाकू' असं म्हणायचा. काही जण त्याला झिडकारीत, काही त्याची टवाळी करीत त्याच्याशी आंबटचिंबट प्रश्नोत्तरे करून तंबाखूची छोटीशी फक्की त्याच्या हातावर टिकवत. तंबाखू हा गुलाबचा 'वीक पॉईंट' असावा, कारण त्यासाठी तो भरपावसात कोणाच्याही दारासमोर उभा राहत असे. त्याला पाहिल्यावर कोणीही भाकर देऊ का? असं कधी विचारलं नाही. 'काय, तंबाखू पाहिजे का?' असंच विचारलं जायचं.

तंबाखू हीच त्याची खरी सखी असावी, म्हणूनच तिच्या प्राप्तीसाठी तो नेहमीच वाट्टेल ते करायला तयार असायचा. कधी कोणाच्या बैलांना घास कापून दे, गायीला पाणी पाज, दळण आणून दे अशी कामं तो तत्परतेनं करीत असे. मात्र हे फक्त तो शहाणा असला की मगच. पुढे पुढे हे त्याचं तात्कालिक शहाणपणं कायमचचं लुप्त होऊ लागले. मग तो एखाद्या झाडाखाली तासन्तास फक्त बसून राहू लागला. कोणी हाक मारली तर त्याच्याकडे दुर्लक्ष करू लागला. पोराटोरांनी चिडवलं तर त्यांच्यावर दगड भिरकावू लागला. संताप आला तर थयथयाट करू लागला. पण तोंडातून कधी अर्वाच्च शिवी येऊ दिली नाही.

बरेच दिवस असेच गेले. आम्ही पोटापाण्यासाठी गाव सोडून काही वर्षे झाली. कधी गावाकडे गेलो तर क्वचित गुलाब त्याच्या नेहमीच्या अवतारात दिसायचा. पाहिल्यावर ओंगळवाणे हसायचा. नंतर आम्हाला गाव जरासे दुरावले. गुलाबही आठवणीच्या पाटीवरून पुसून गेला.

मध्यंतरी मध्यरात्रीच्या वेळी रेल्वेस्टेशनवर जावे लागले. सुपरफास्ट एक्स्प्रेसने येणाऱ्या पाहुण्यांची वाट पाहत उगाचाच फलाटावर भटकत असताना अचानक गुलाब दिसला. सोबत त्याची आईदेखील होती. स्टेशनच्या भिकाऱ्यांमध्ये एकरूप झालेली त्या दोघांची रूपे पहिल्यांदा ओळखूच आली नाहीत. निरखून पाहिल्यावर चेहरे ओळखीचे वाटू लागले. भ्रमिष्टासारख्या बसलेल्या त्याच्या आईच्या मांडीवर डोके ठेवून अंगाची घडी करून गुलाब निरागसपणे झोपला होता. अंगावरच्या मळलेल्या कपड्यांच्या चिंध्यांनी थंडीला थोपविताना तो थडथडत होता. त्याची आई मात्र निर्विकारपणे येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्यांकडे एकटक पाहत होती.

कशाला आणले असावे तिने गुलाब येथे? कोणा भगताकडे न्यायला? एखाद्या देवाच्या पायावर वाहायला? चांगल्या डॉक्टरांकडं दाखवायला? गर्दीत बेवारस सोडायला? की वैतागलेल्या आयुष्याचा शेवट करण्यासाठी रेल्वेखाली त्याला ढकलून द्यायला? विचारांच्या भुंग्यानी डोक्याचं वारूळ होत होतं; पण तिला ओळख दाखवून विचारण्याची हिंमत झाली नाही. अखेरीस लांब उभा राहून मी पाहुण्यांच्या गाडीची वाट पाहू लागलो.

कालपरवा गावाकडे गेलो. सहज बोलताना गुलाबचा विषय निघाला. त्याची चौकशी केली तर तो देवांना शहाणपण शिकवायला कायमचाच गेल्याचं समजलं. मृत्यूनंतरही त्याच्या नशिबी उपेक्षाच आली. कोठेतरी भटकत असताना बेवारसपणे तो मेला. कोणाच्या तरी लक्षात आल्यावर गावाला समजलं, मग लोकलज्जेस्तव त्याची चिता रचण्यात आली. त्याचा प्रेत जळत असताना कोणी रडलं नाही, कोणी कोणाचं सांत्वन केलं नाही. अर्थात तो जिवंत होता म्हणून कोणाला कधी आनंद झाला नाही अन् तो मेला म्हणून कोणाच्या डोळ्यात पाणीही आलं नाही. कारण तो जन्माला कशाला आला असावा? कोणत्या प्राक्तनाचा लेख फेडायला तो येथे आला असावा?...

iron_ray@rediffmail.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**किरण लोखंडे**
एन-४२ जेई १, १७/३ विठ्ठल मंदिरासमोर, सावता नगर, सिडको, नाशिक ४२२००८
**भ्रमणध्वनी :** ९९२२९१९४३८ / ९८२२५२११४०

हे प्रिय

जर हे पुस्तक तुम्ही शेवटपर्यंत वाचलंय तर आम्ही तुमच्याच शोधात आहोत.

या पुस्तकाचे पुढचे भाग वाचायची इच्छा असेल तर तुम्ही आमच्या आणि आम्ही तुमच्या शोधात आहोत.

आम्ही तुमच्याच शोधात आहोत.

हाडाच्या वाचकाच्या. ज्यांची वाचनाची निवड मनोरंजन किंवा कुतुहलाच्या पलिकडची आहे.

जाणकार वाचक नसेल तर दर्जेदार साहित्य निर्माण होण्याची शक्यता नाही. म्हणून दोन कोटी लोकसंख्या असलेल्या देशांना नोबेल पारितोषिकं मिळतात. अनेक बारिक बारिक देशांत अत्यंत दर्जेदार साहित्य निर्माण होतं. पण ज्ञानोबा तुकोबांनी समृद्ध केलेल्या या महाराष्ट्रात आज काऊ चिऊच्या गोष्टींचा रतीब चालतो. मानवी अंतर्व्यवहारांच्या खोल अंधारात बुडी मारायला त्या कुवतीचा लेखक हवा आणि तेवढ्याच जाणकारीचा वाचकही. महान साहित्य केवळ हातांत पेन धरून नाही बनत. त्यासाठी काळजावर निखारा ठेवावा लागतो. ती हिंमत, ती कुवत आणि ती खाज फ़ार कमी लेखकांकडे असते. आणि त्यांना प्रोत्साहन देण्याची प्रगल्भता फ़ार कमी समाजांत असते. मराठीत ती होती. पण आज ती नाही. आणि ती जोपासण्याचा कोणी प्रयत्नही करत नाही. पैशाच्या गर्दभरेसमध्ये उतरलेल्या व्यावसायिकांकडून ती अपेक्षाही नाही. साहित्य संमेलनांचा उत्सवी आनंदमेळा भरवणार्‍यांकडूनही नाही. आणि पुण्यामुंबईच्या शहाण्यासुरत्या सुशिक्षितांकडूनही नाही.

पण आता एक नवीन वाचकवर्ग उभारताना दिसतो आहे. मुठभर.  अगदीच नगण्य संख्येचा. पण आशादायी. बेबाक जाणिवांनी भारलेले साहित्य ओळखण्याची आणि पचवण्याची भूक असलेला.

हे वाचका तुला सलाम! तूच उद्याचा सूर्य आहेस. कारण तुझ्याच प्रकाशात असले लेखन अंकुर धरेल. तुझ्याच प्रकाशात ते बहरेल. तुझ्याच प्रकाशात ते फ़ळेल. आणि त्याचं बियाणं पसरत राहील.

कृपया तुझे पत्र आम्हाला पाठव. आपली तुपली ओळख व्हायला हवी. वाढायला हवी.

esahitya@gmail.com

www.esahity.com